महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र
रजि.नं. महा/२८५/९८/नागपूर

मिळून सारेजण करू द्विजगण रक्षण !
महाराष्ट्र पक्षिमित्र
स्थापना १९८९

# पक्षिमित्र

वर्ष १० वे । अंक ३ रा । दि. १ एप्रिल २०२० । पाने – ३५ । संपादक : दिगंबर गाडगीळ



## * संपादक *

– संपादक

**श्री. दिगंबर गाडगीळ**
३९, आनंदवन कॉलनी, ऑफ कॉलेज रोड, नाशिक – ४२२००५
स्थिरभाष : (०२५३) २५७७९६८ । चलभाष : ९८८१०७९७११

– सहसंपादक

**श्री. अनिल माळी, नाशिक** / Email : anilmali@yahoo.co.in
**श्री. किरण मोरे, अमरावती** / Email : kiranmorey1983@gmail.com

## * कार्यकारिणी *

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | – | डॉ. जयंत वडतकर, अमरावती (मो. ९८२२८७५७७३) |
| कार्याध्यक्ष | – | डॉ. राजू कसंबे, ठाणे (मो. ९००४९२४७३१) |
| संघटक | – | प्रा.डॉ. सुधाकर कुऱ्हाडे, अहमदनगर (मो. ९४०४६९६४६९) |
| कार्यवाह | – | प्रा.डॉ. गजानन वाघ, अमरावती (मो. ९८२२२०४०७०) |
| सहकार्यवाह | – | श्री. शरद आपटे, सांगली (मो. ९८९०३८४४००) |
| सहसंघटक | – | श्री. अनिल माळी, नाशिक (मो. ९८५०८१८६४४) |
| सदस्य | – | प्रा. निनाद शाह, सोलापूर (मो. ९४२२४५९९१५) |
| सदस्य | – | श्री. किशोर गवठी, औरंगाबाद (मो. ९४२२२०२६२८) |
| सदस्य | – | श्री. रोहन भाटे, कराड (सातारा) (मो. ९४२२००४८००) |
| सदस्य | – | श्री. सचिन मेन, पालघर (मो. ८४४६२४८८८४) |
| सदस्य | – | श्री. अनिल महाजन, वरणगाव–जळगाव (मो. ८८०६१९८०४०) |

## * सल्लागार मंडळ *

श्री. भाऊ काटदरे (चिपळूण) मो. ९४२३८३१७००
श्री. दिगांबर गाडगीळ (नाशिक) मो. ९८८१०७९७११
डॉ. दिलीप यार्दी (औरंगाबाद) मो. ९४२२७०४२२१
डॉ. अनिल पिंपळापुरे (नागपूर) मो. ९८८१७१३४६६
श्री. बापुसाहेब भोसले (अहमदनगर) मो. ९८२२६३३१३३

मुखपृष्ठ – Indian Courser (भारतीय धाविक) | छायाचित्र : प्रा.डॉ. गजानन वाघ, अमरावती

# संपादकीय
## महाराष्ट्रातील पहिले 'रामसर'

कित्येक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर नांदूरमध्यमेश्वरच्या पक्षी अभयारण्याचा समावेश 'रामसर' यादीत झाल्याची घोषणा २७ जानेवारी २० रोजी झाली याबद्दल आनंद आहे.

'रामसर' योजनेला सहा जागतिक संस्थांचे पाठबळ आहे. त्यासाठी जो करार झाला आहे त्यावर भारतासकट १६८ देशांनी सह्या केल्या आहेत. घोषित पाणथळ जागेचा वापर चाणाक्षपणे होणे अपेक्षित आहे. या पाणथळ जागेचा उपयोग कुठल्याही खासगी कामासाठी न होता तेथील जैवविविधतेचे संरक्षण करणे ही जबाबदारी आहे.

गोदावरी व कादवा नद्यांच्या संगमावर १९१३ साली धरण बांधण्यात आले. कालांतराने तेथील पाणपसाऱ्यावर पक्ष्यांना उपयुक्त असे क्षेत्र नैसर्गिकरीत्या तयार झाल्यावर तिथे स्थलांतरित पक्षी हिवाळ्यात गर्दी करू लागले. सुरुवातीला शिकारबंदीनंतर अभय प्रदेश निर्मिती झाल्यावर तिथे वनविभागाकडून अधिकाधिक सुधारणा होऊ लागल्या. त्याचे क्षेत्र ११९८ हेक्टर एवढे आहे. त्यात जलसंधारण विभागाचा वाटा ९९४ हेक्टर, महसूल विभागाचा १५० हेक्टर आणि वनविभागाचा ५५ हेक्टर एवढा आहे.

या 'रामसर' क्षेत्रात ५३६ प्रकारच्या जलीय व भूपृष्ठीय वनस्पती, ३० प्रकारचे मासे, २६५ जातींचे पक्षी, ४१ प्रकारची फुलपाखरे आणि ८ प्रकारचे सस्तन प्राणी यांचे वर्षभरात दर्शन होते.

नांदूरमध्यमेश्वर पक्षी अभय प्रदेशाची नोंद आता 'रामसर' संदर्भात झाली असल्याने तो परिसर स्वच्छ प्रदूषणमुक्त कसा राहील आणि तेथील जैवविविधता कशी अबाधित राहील हे पाहण्याची जबाबदारी वाढली आहे. त्यासाठीचे आधुनिक तंत्रज्ञान स्वीत्झर्लंडच्या मध्यवर्ती कचेरीकडून मिळू शकेल. त्याच्या सुयोग्य व्यवस्थापनासाठी अर्थसहाय्य कदाचित मिळू शकेल.

हा धरण परिसर असल्याने त्याची जबाबदारी जलसंधारण विभागाकडे आहे. तो पक्षी अभय प्रदेश असल्याने त्याचे व्यवस्थापन वनखात्याकडे आहे. महसूल विभागाकडे काही भाग असल्याने ती जबाबदारी अंतिमत: जिल्हाधिकाऱ्यांकडे येते. या तिन्ही खात्यांत व्यवस्थित समन्वय राहणे आवश्यक आहे. तसा तो राहावा यासाठी कायमस्वरूपाची समन्वय यंत्रणा उभारली गेली पाहिजे. ती उभारण्याची तत्परता जिल्हाधिकाऱ्यांनी दाखवावी असे सुचवू इच्छितो.

नांदूरमध्यमेश्वरचा 'रामसर' परिसर एक अदार्श पाणथळ राहील, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

**दिगंबर गाडगीळ**
नाशिक
९८८१०७९७११

# अध्यक्षीय

महाराष्ट्र पक्षीमित्र चे ३३ वे राज्यस्तरीय संमेलन रेवदंडा (अलिबाग) येथे अमेझिंग नेचर या संस्थेच्या यजमानपदाखाली जानेवारीत मोठ्या उत्साहात पार पडले. सदर आयोजनासाठी आयोजकांनी अथक परिश्रम घेऊन हे संमेलन उत्कृष्टपणे पार पाडले त्याबद्दल सर्वप्रथम आयोजक अमेझिंग नेचर आणि सहआयोजक ग्रीन वर्क्स ट्रस्ट आणि स्वराज्य प्रतिष्ठान या संस्थांचे मन:पूर्वक अभिनंदन! प्रायोजक 'मॅंग्रोव्ह फाऊंडेशन' मुंबई आणि अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, वन्यजीव (पश्चिम) मुंबई कार्यालयाचेसुद्धा आभार. विशेष म्हणजे संमेलनाच्या आयोजनाची जबाबदारी प्रथमच एका महिलेने स्वीकारली. या तरुणीचे नाव कु. रुपाली मढवी. या तरुणीने या संमेलनासाठी पुढाकार घेऊन हे संमेलन यशस्वी करून दाखविले, त्याबद्दल तिचे विशेष अभिनंदन. संमेलनाचे स्थळ हे एका लहान गावात असूनही सर्वच व्यवस्था उत्कृष्ट करण्याचा आयोजकांनी प्रयत्न केला. नाविन्यपूर्ण गोष्टी करण्याचा प्रयत्न केला. या संमेलनासाठी महाराष्ट्रातील ३०० पक्षीमित्रांनी ऑनलाईन पद्धतीने नोंदणी केली होती. या नाविन्यपूर्ण प्रक्रियेमुळे पेपर वाचवून पर्यावरणाच्या संवर्धनात हातभार लावला गेला. मागील वर्षाप्रमाणे यावर्षीसुद्धा वर्धा येथून आपले सभासद श्री. दिलीप विरखडे, प्रा. किशोर वानखडे, श्री. दीपक गुढेकर आणि दर्शन दुधाने वर्धा ते रेवदंडा ७५० किलोमीटरचे अंतर सायकलने पार करून संमेलनास पोहोचले. नांदूर मध्यमेश्वर येथून वनपाल श्री. अशोक काळे आणि मुंबई येथून जुही कोपकर आणि जे.पी. शेट्टी हे या यात्रेत सहभागी होऊन संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी रेवदंडा येथे पोहोचले त्यामुळे उपस्थित सर्वच पक्षिमित्रांचा उत्साह द्विगुणित झाला होता. या संमेलनासाठी उपस्थित असलेले अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, वन्यजीव (पश्चिम) मुंबई श्री सुनील लिमये यांनी वन विभाग आणि महाराष्ट्र पक्षीमित्र पक्षी संवर्धनासाठी एकत्र येऊन भविष्यात कार्य करता येऊ शकेल असा आशावाद व्यक्त केला. तसेच माजी संमेलनाध्यक्ष व जेष्ठ वन्यजीव तज्ज्ञ श्री. किशोर रिठे यांनी आपल्या अनुभवातून भविष्यात पक्षी संवर्धन आणि महाराष्ट्र पक्षीमित्रची वाटचाल कशी असावी, याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. याशिवाय संमेलनाचे उद्घाटक रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी उपस्थित राहून पक्षिमित्र चळवळीची माहिती जाणून घेऊन चळवळीस सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. संमेलनासाठी विधानभवन उपसचिव श्री. नागनाथ थिटे ही चळवळ जाणून घेण्यासाठी पूर्ण दिवस आवर्जून उपस्थित होते.

संमेलनामध्ये पार पडलेल्या सत्रांमध्ये यावेळी विविधता होती. तसेच अनेक सादरीकरणे अभ्यासपूर्ण आणि उच्च दर्जाची होती. एकूणच सादरीकरणे बघून आपले पक्षिमित्र संशोधकांप्रमाणे अभ्यास करीत असून यातून अभ्यासाचा दर्जा आणि संवर्धनाबाबतच्या प्रयत्नात वाढ झाल्याचे दिसून आले. आपल्या संमेलनांचे आकर्षण आता या क्षेत्रात कार्यरत मोठ्या नावाजलेल्या संस्था, पक्षी शास्त्रज्ञ आणि राज्याबाहेरील पक्षिमित्रांनासुद्धा असल्याचे अलीकडे दिसून येत आहे. बॉम्बे नचरल हिस्ट्री सोसायटी ही संस्था तर नेहमीच महाराष्ट्र पक्षीमित्र सोबत असते. यावेळी सॅकॉन म्हणजेच कोयंबतूर येथील सालिम अली सेंटर फॉर ऑर्निथॉलोजी या संस्थेचे शास्त्रज्ञ डॉ. शिरीष मंची हे संमेलनात सहभागी झाले होते आणि त्यांनी त्यांचे अभ्यासपूर्ण असे सादरीकरणसुद्धा केले. ई–बर्ड हे ॲप्लिकेशन राबविणाऱ्या संस्थेकडून कु. पूजा पवार आणि मित्तल गाला ह्या संमेलनात सहभागी झाल्या होत्या आणि त्यांनी ई–बर्ड हे ॲप कसे काम करते आणि गोळा झालेला डेटा कसा वापरता येईल यावर संमेलनात भाष्य केले. हे ॲप्लिकेशन वापरून पक्ष्यांची माहिती गोळा करण्यासाठी महाराष्ट्र पक्षिमित्रकडून त्यांना मोठ्या अपेक्षा आहेत. या ई – बर्डच्या डेटावरून काढलेले निष्कर्ष नुकतेच गांधीनगर येथे पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत मांडण्यात आले. त्यानुसार देशातील पक्ष्यांची संख्या कमी होत असून फक्त मोर, राखी वटवट्या, पळसमैना सारखे काही पक्षी वाढले असल्याचे समोर आले. शिकारी पक्षी, स्थलांतरित पक्षी, आणि कीटक भक्षी पक्षी कमी झाल्याचे सुद्धा यामध्ये नमूद केले असून ही निश्चितच चिंतेची बाब आहे.

यासोबतच विभागीय स्तरावरील उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भ विभागातील संमेलनेसुद्धा याच दरम्यान पार पडली. यामध्ये २० वे विदर्भ मी लोणारकर या ग्रुपच्या वतीने लोणार येथे दिनांक ८–९ फेब्रुवारी २०२० उत्साहात संपन्न झाले. तसेच उत्तर महाराष्ट्र संमेलन दि. १ फेब्रुवारीला जळगाव येथे पार पडले. या दोन्ही संमेलनाच्या आयोजकांचे मनपूर्वक आभार. या संमेलनांचा अहवाल या अंकात सविस्तर देण्यात आलेला आहे. एका नाविन्यपूर्ण उपक्रमात ठाणे येथे होप, ठाणे या संस्थेने तिसरे आणि अकोला येथे निसर्ग कट्टा संस्थेने सातवे आणि वर्धा येथील बहार नेचर फाउंडेशनने दुसरे विद्यार्थी पक्षिमित्र संमेलनाचेसुद्धा यशस्वी आयोजन केले होते. तसेच दि. १९ फेब्रुवारीला वर्धा जिल्ह्यात बहारकडूनच शेतकरी पक्षिमित्र संमेलनाचेसुद्धा आयोजन केले होते. अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे पक्षिमित्र चळवळ सर्वच स्तरात रुजण्यास मदत होणार आहे, आणि यातूनच नवीन पक्षिमित्र तयार होऊन पक्षी अभ्यास व संवर्धन होण्यास मदत होणार आहे यात कुठलीही शंका नाही.

मागील काही दिवसात रामसर मुद्यावर सर्वत्र चर्चा झडत होती. संमेलनातसुद्धा यावर चर्चा झाली, आणि त्यानंतर लगेच काही दिवसात देशातील १३ ठिकाणांना रामसर स्थळांचा दर्जा मिळाल्याची बातमी हाती आली. या १३ मध्ये महाराष्ट्रातील एकमेव अशा नांदूर मध्यमेश्वरचाचा समावेश पाहून थोडा भ्रमनिरस झाला. मात्र देशातील १३ स्थळे या यादीत आली, ही पाणथळ आणि पक्षी संवर्धनासाठी महत्त्वाची घटना म्हणावी लागेल. नांदूर मध्यमेश्वरच्या रूपाने महाराष्ट्रास पहिले रामसर स्थळ मिळाले, ही आपल्या सर्वांसाठी आनंदाची बाब आहे. यासाठी सर्वच सबंधित अधिकारी व संस्था यांचे मन:पूर्वक आभार. वास्तविक महाराष्ट्रातील किमान १० स्थळे रामसर होऊ शकतात. यातील काहींचे प्रस्तावसुद्धा पाठविले गेले होते. त्यांपैकी लोणारलासुद्धा हा दर्जा मिळणार अशी चर्चा आणि अपेक्षासुद्धा होती. राहिलेल्या स्थळांच्या प्रस्तावांचा शासन स्तरावरून पाठपुरावा केला जाईलच किंबहुना आपल्यालासुद्धा यामध्ये लक्ष घालून शासनाचा पाठपुरावा करावा लागणार आहे. त्यानंतर आणखी काही सक्षम प्रस्ताव मान्य होऊन राज्यात काही रामसर स्थळे होतील अशी अपेक्षा करू या.

**डॉ. जयंत वडतकर**
**अध्यक्ष, महाराष्ट्र पक्षिमित्र**
**(९८२२८७५७७३)**




प्रवेशद्वार – महाराष्ट्र पक्षीमित्र चे ३३ वे राज्यस्तरीय संमेलन, रेवदंडा (अलिबाग)

# ३३ वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन उत्साहात संपन्न

महाराष्ट्रातील पक्षीमित्रांकरिता उत्सवासमान असलेले ३३ वे 'महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन' – अलिबागमधील रेवदंड्यात दि. ११ आणि १२ जानेवारी रोजी संपन्न झाले. या पक्षी उत्सवासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून सुमारे पाचशे पक्षीमित्र या संमेलनास उपस्थित होते. महाराष्ट्रातील पक्षी निरीक्षण चळवळ निर्माण करण्यात 'महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलना' चा मोठा वाटा आहे. १९८१ पासून या संमेलनाचे आयोजन करण्यात येत आहे. स्थलांतरित पाणपक्ष्यांचे माहेरघर मानले जाणाऱ्या रेवदंड्यात संमेलनाचे आयोजन 'अमेझिंग नेचर' रेवदंडा या संस्थेने केले होते. या संमेलनास 'ग्रीन वर्क्स ट्रस्ट' आणि 'स्वराज्य प्रतिष्ठान या संस्थां सह–आयोजक म्हणून लाभल्या होत्या. तसेच संमेलनासाठी 'मँग्रोव्ह फाऊंडेशन' मुंबई आणि अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, वन्यजीव (पश्चिम) मुंबई कार्यालयाचे प्रायोजकत्व मिळाले. या संमेलनासाठी महाराष्ट्रातील ३०० पक्षीमित्रांनी ऑनलाईन नोंदणी केली होती. या नाविन्यपूर्ण प्रक्रियेमुळे पेपर वाचवून पर्यावरणाच्या संवर्धनात हातभार लावला गेला.

### उद्‌घाटन सोहळा

दि. ११ जानेवारी रोजी सकाळी संमेलनाचा उद्‌घाटन सोहळा संपन्न झाला. यावेळी रेवदंड्यातील भंडारी समाज सभागृह पक्षीमित्रांनी गजबजले होते. संमेलनाचे उद्‌घाटक म्हणून रायगड जिल्हाधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी आणि प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, वन्यजीव (पश्चिम) श्री. सुनील लिमये उपस्थित होते. यावेळी संमेलनाचे माजी अध्यक्ष वन्यजीव अभ्यासक श्री. किशोर रिठे, संमेलनाध्यक्ष तथा पक्षी अभ्यासक डॉ. राजू कसंबे, संमेलनाच्या आयोजिका रूपाली मढवी आणि महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर यांची उपस्थिती लाभली होती. या समारंभात संमेलनाचे मावळते अध्यक्ष किशोर रिठे यांनी संमलेनाच्या अध्यक्षपदाची धुरा संमेलनाध्यक्ष डॉ. राजू कसंबे यांचेकडे सोपवली.

### महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेतर्फे 'महाराष्ट्र पक्षिमित्र पुरस्कार' :

मुख्य कार्यक्रमामध्ये संघटनेतर्फे प्रथमच जाहीर केलेल्या २०१९ च्या पक्षीमित्र पुरस्कारांचे वितरणसुद्धा यावेळी करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ पक्षीनिरीक्षक बाळासाहेब कुलकर्णी, पुणे यांना 'जीवनगौरव पुरस्कार' देण्यात आला. 'पक्षी संवर्धन व शुश्रुषा पुरस्कार' गोंदिया येथील मुकुंद धुर्वेयांना आणि अमळनेरचे अश्विन पाटील व जुन्नर येथील प्रशांत वाघ यांना 'पक्षिसंशोधन/ जनजागृती पुरस्कार' प्रदान करण्यात आले.

### उदयोन्मुख पक्षीमित्र पुरस्कार

होप संस्था ठाणे तर्फे संमेलनात देण्यात येणारे तीन उदयोन्मुख पक्षीमित्र पुरस्कार ध्यानेश डुकरे, सतेज बागडे आणि प्रणव बागवे या विद्यार्थ्यांना देऊन सन्मानित करण्यात आले.

### पुस्तकांचे प्रकाशन

संमेलनाच्या उद्‌घाटन सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते पक्षीमित्रांनी लिहिलेल्या चार पुस्तकांचे व संमेलन स्मरणिका 'विहंगराज'चे प्रकाशन करण्यात आले. पक्षी विषयक पुस्तकांमध्ये प्रा. डॉ. गजानन वाघ लिखित 'अमरावती जिल्ह्यातील पाणथळ व पाणपक्षी', अमरावती येथील श्री. किरण मोरे लिखित 'माळरानावरील चंडोल', पालघर येथील श्री. सचिन मेन यांनी लिहिलेले 'रोजनिशी मोरपिशी आठवणींची' आणि श्री. निखिल भोपळे लिखित 'वेन इन डाऊट, ट्राय इट आऊट–प्लवर ॲण्ड सॅण्डपायपर' या पुस्तकांचा समावेश होता.

**विहंगसार**

उद्घाटनाच्या वेळी पक्षीमित्राची कर्तव्ये याबाबत महाराष्ट्रातील जेष्ठ पक्षीमित्र यांचे मनोगत फिल्म व्दारे दाखवून महाराष्ट्र पक्षीमित्रचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर यांनी ती विहंगसारच्या स्वरूपात मांडली आणि प्रत्येक पक्षीमित्रांकडून वदवूनदेखील घेतली.

**संमेलनाध्यक्ष भाषण**

संमेलनाच्या उद्घाटन कार्यक्रमातील अध्यक्षीय भाषणात डॉ. राजू कसंबे यांनी पक्षिनिरीक्षण आणि लिखाणामधील संवदेनशील विषयांवर भाष्य केले. पक्षिनिरीक्षकांनी नेहमीच विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन जपणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी यावेळी मांडले. पक्ष्यांसंबंधी केलेल्या नोंदी आणि लिखाण लोकांपर्यंत पोहोचविण्याकरिता समाज माध्यमांचा वापर करणे गरजेचे असल्याचे डॉ. कसंबे यांनी नमूद केले. पक्षी निरीक्षण करताना कॅमेऱ्याऐवजी दुर्बिणीचा वापर करा, छायाचित्रणावेळी पक्ष्यांना धोका पोहोचणार नाही, याची काळजी घेण्याचा मौलिक सल्लाही त्यांनी पक्षीमित्रांना दिला. सरतेशेवटी त्यांनी महाराष्ट्रातील 'रामसर स्थळांची मुद्दा अधोरेखित करून लवकरच महाराष्ट्राला पहिले 'रामसर स्थळ' मिळण्याची आशा व्यक्त केली. यावेळी संमेलनाचे मावळते अध्यक्ष श्री. किशोर रिठे यांनी संमेलनाच्या आयोजनामध्ये वन विभागाचा वन्यजीव विभाग आणि महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेमध्ये समन्वय असणे आवश्यक असल्याचे सांगितले.

**संमेलनाचे उद्घाटक भाषण**

संमेलनाचे उद्घाटक जिल्हाधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी आपल्या उद्घाटनपार भाषणात पक्षीमित्र चळवळीचे कौतुक करून रायगड जिल्ह्यातील पक्ष्यांवर आधारित कॉफी टेबल बुक जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्रकाशित करण्यात येणार असल्याचे जाहीर केले.

**छायाचित्र स्पर्धा**

संमेलनामध्ये पक्षी छायाचित्र स्पर्धेचे आयोजनसुद्धा करण्यात आले होते. संमेलन स्थळी स्पर्धेतील सहभागी छायाचित्रांना प्रदर्शित करण्यात आले होते.  स्पर्धतील विजेत्यांमध्ये प्रथम पारितोषिक विजेते श्री. यशोधन भाटिया, दुसरे पारितोषिक श्री. हिरा पंजाबी, तिसरे पारितोषिक श्री. इंद्रनील मलिक आणि उत्तेजनार्थ पारितोषिक श्री. दिवाकर ठोंबरे, गिरीश मेनन यांच्या छायाचित्रांना देण्यात आले. विजेत्याना रोख रक्कम व मानचिन्ह देऊन यावेळी सन्मानित करण्यात आले.

**पक्षीमित्रांना भेटवस्तू :**

संमेलनाच्या सभामंडपामध्ये भाताची तोरणे लावण्यात आली होती. त्यावर तांदळाच्या दाण्याचा आस्वाद घेत, पक्ष्यांनीदेखील संमेलनात हजेरी लावलेली दिसली. संमेलनात येणाऱ्या प्रत्येक पक्षीमित्रास ही तोरणे भेट म्हणून देण्यात आली.

**वाळू शिल्प :**

संमेलन स्थळी, दर्शनी भागात श्री. महेंद्र गावंड (बेलोशी) यांनी वाळू शिल्प साकारले होते. हे शिल्प संमेलनासह आजुबाजूच्या परिसराची माहिती देत होते. यामधे समुद्री गरुड, मासा, रेवदंडा किल्ला, सागर किनारा या सर्व गोष्टींचा समावेश करण्यात आला होता.

**मिठाची रांगोळी :**

मिठाची रांगोळी ही या भागाची खास ओळख. नेहा पाटील हिने मिठाच्या रांगोळीतून संमेलनांचे चिन्ह साकार केले होते.

**कर्नाळा स्मरण वस्तू केंद्र**

३३ व्या महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनामध्ये विविध खासगी आणि सरकारी संस्थांकडून निसर्ग साहित्य वस्तू केंद्र उभारण्यात आली होती. यांमध्ये पक्ष्यांचे माहेरघर समजल्या जाणाऱ्या कर्नाळा पक्षी अभयारण्याच्या केंद्राचा समावेश होता. विशेष म्हणजे, या केंद्रामध्ये रानसई गावातील 'ग्राम परिस्थितीकीय विकास समिती' चे सदस्य सहभागी झाले होते. या केंद्राचे उद्‌घाटन संमेलनाच्या पहिल्या दिवशी पार पडले. केंद्रामधील साहित्य विक्रीतून निर्माण झालेला निधी रामसई समितीच्या विकासाकरिता देण्यात आला.

**प्रकट मुलाखत**

पहिल्या दिवशी पार पडलेल्या विविध कार्यक्रमांमध्ये राज्याचे अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, वन्यजीव (पश्चिम) सुनील लिमये यांची प्रकट मुलाखत विशेष लक्षवेधी ठरली. यावेळी त्यांनी भविष्यातील पक्षी संवर्धनाच्या विविध बाबींवर आणि महाराष्ट्र पक्षीमित्र व वनविभागाच्या समन्वय यावर भाष्य केले. यावेळी पक्षीमित्र संघटनेचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर यांनी मुलाखतकाराची भूमिका बजावली.

**रेवदंडा येथील शालेय विद्यार्थी**

चि. विवेक अशोक बनिया हा उत्सुकतेने संमेलनातील सर्व सत्रांमध्ये उपस्थित असतांना काही पक्षीमित्रांनी त्याला हेरले. त्याची उत्सुकता बघुन त्याचा आयोजकांच्या वतीने सत्कार करण्यात येऊन त्याला पक्षी व वन्यजीव अभ्यासात मदत करण्याची ग्वाही यावेळी महाराष्ट्र पक्षीमित्र तर्फे देण्यात आली.

**समारोप समारंभ समारोप**

दोन दिवस चालणाऱ्या संमेलनाचा १२ जानेवारी २०२० रोजी समारोप झाला. समारोपाच्या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून विधानभवन उपसचिव श्री. नागनाथ थिटे, संमेलनाध्यक्ष डॉ. राजू कसंबे, 'महाराष्ट्र पक्षीमित्रा'चे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर, ३३ व्या संमेलनाच्या आयोजक रुपाली मढवी आणि आयोजकांचे कार्यवाह म्हणून शीतल पाटील मंचावर उपस्थित होते. उपसचिव श्री. थिटे यांनी संमेलनातील सर्वच सादरीकरणे व उपक्रम उत्कृष्ट प्रतीचे असल्याचे सांगितले. संमेलनाध्यक्ष डॉ. राजू कसंबे यांनी अमेझिंग नेचर संस्थेला धन्यवाद देताना सर्व समर्पक संमेलन असे उद्‌गार काढले. महाराष्ट्र पक्षीमित्राचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर यांनी ३४ वे संमेलन सोलापूर येथील डॉ. मेतन फाउंडेशनच्या यजमान पदाखाली सोलापूर येथे होणार असल्याचे जाहीर केले. डॉ. मेतन फाउंडेशनच्या वतीने डॉ. व्यंकटेश मेतन यांनी सर्वांना पुढील संमेलनासाठी सोलापूरचे निमंत्रण दिले. आयोजक रुपाली मढवी हिने आभार प्रर्दशन करून संमेलनाची सांगता केली.

**फणसाड अभयारण्य**

फणसाड अभयारण्यातसुद्धा पक्षीमित्रांचा किलबिलाट ऐकू यावा यासाठी संमेलनाच्या शेवटच्या सत्रामध्ये तिसऱ्या दिवशी फणसाड अभयारण्य पक्षी निरीक्षण सहलीचे आयोजन करण्यात आले होते. अभयारण्यातील बांबू हाऊस, टेंटमध्ये मुक्कामी असलेले पक्षिमित्र सोमवारी सूर्योदय होताच, पक्षी निरीक्षणासाठी अभयारण्यात रानवाटा तुडवत निघाले.

### सायकल रॅली

संमेलनात हजर होण्यासाठी एक हजार किलोमीटर सायकलद्वारा पूर्ण करीत जिगरबाज पक्षीमित्र संमेलन स्थळ पोहोचले. सायकल प्रवासातील मार्गावरील गावांमध्ये पक्षी निरीक्षण करण्यासोबत स्थानिकांना प्रबोधन केले. पर्यावरणपूरक सायकल हे पक्षिमित्रांचे वाहन व्हावे, हा संदेश घेऊन प्रा. किशोर वानखेडे, महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे विदर्भ समन्वयक श्री. दिलीप विरखडे, बहारचे सदस्य दीपक गुढेकर, आणि महाविद्यालयीन विद्यार्थी दर्शन दुधान हे सहभागी झाले होते. मुंबईवरून ८० किलोमीटर प्रवास करून आलेली महिला जुही कोपकर आणि जे. पी . शेट्टी तसेच नाशिकवरून वन सरंक्षक अशोक काळे यांनी सायकल यात्रा करून हजेरी लावली.

### शासन स्तरावर 'पक्षी सप्ताह'

पक्षी अभ्यास व संरक्षण यास चालना मिळावी यासाठी 'महाराष्ट्र पक्षीमित्र'तर्फे गेल्या तीन वर्षांपासून राज्यात पक्षी सप्ताहाचे आयोजन केले जात आहे. हा पक्षी सप्ताह शासन स्तरावरून सुद्धा साजरा केला जावा या मागणीचे निवेदन पक्षीप्रेमींनी मंत्रालयात सायकल रॅलीद्वारे जाऊन दिले. वन्यजीवांचे संरक्षण व पक्षी संवर्धनासाठी दरवर्षी ५ ते १२ जानेवारी हा आठवडा पक्षी सप्ताह म्हणून साजरा व्हावा. त्यासंदर्भात शासनाने स्वतंत्र परिपत्रक प्रसिद्ध करावे, या मागणीसाठी राज्यातील पक्षी मित्रांच्या समूहाने सायकल रॅली काढून मुंबईत मुख्यमंत्री कार्यालयात निवेदन दिले. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान मा. सचिव विकास खारगे यांनी पक्षी मित्रांनी दिलेले निवेदन स्वीकारून अंमलबजावणीचे आश्वासन दिले.

### किनारी पक्षी कार्यशाळा

३३ व्या 'महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनाच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी दि. १० तारखेला सागरी किनारी पक्षी कार्यशाळा पार पडली. आक्षी किनाऱ्यावर आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेत महाराष्ट्रातील विविध भागांतून मोठ्या संख्येने आलेले पक्षिमित्र सहभागी झाले होते. यावेळी त्यांनी किनाऱ्यावर भ्रमंती करून दीड तासात १८ प्रजातींच्या स्थलांतरित पाणपक्ष्यांची नोंद केली. किनारी पक्षी कार्यशाळेच्या माध्यमातून शुक्रवारी या संमेलनाची एका अर्थाने नांदी झाली. 'ग्रीन वर्क्स ट्रस्ट'च्या माध्यमातून या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेला 'ग्रीन वर्क्स ट्रस्ट'चे विश्वस्त आणि प्रसिद्ध वन्यजीव अभ्यासक निखिल भोपळे यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यशाळेत समुद्र किनाऱ्यावर आढळणाऱ्या स्थलांतरित पक्ष्यांना ओळखण्यासंबंधी मार्गदर्शन करण्यात आले.

संमेलनाच्या दोन दिवसात विविध सत्रांमधून राज्यातील वेगवेगळ्या ठिकाणच्या पक्षी अभ्यासकांची सादरीकरणे पार पडलीत. यामध्ये प्रथम सत्र हे, संमेलनाची मध्यवर्ती संकल्पना समुद्र किनारचे पक्षी या विषयावरील होते.

### सत्र १ ले – समुद्र किनाऱ्याचे पक्षी – सूत्रसंचालक: श्री. सुधाकर कुऱ्हाडे

१. डॉ. वैभव देशमुख आणि प्रवीण कवले यांनी अलिबागचे पक्षी वैभव. अलिबागमधील पक्षी व त्याचा अधिवास याबद्दल माहिती दिली

२. ३३ व्या संमेलनचा पक्षी म्हणून ज्याची निवड केली होती त्या समुद्र गरुडावर ठाणे येथील श्री. अविनाश भगत यांनी अतिशय अभ्यासपूर्ण सादरीकरण करून खूप रंजक अशी माहिती दिली

३ सागर म्हात्रे यांनी कांदळवनातील पक्षी याबाबत माहिती दिली.

४ प्रदीप चौगुले यांनी भरती ओहोटीच्या मध्यंतरीचा सागरी अधिवासामध्ये कुठले पक्षी येतात या वर सादरीकरण केले

५. कोयंबतूर येथील SACON संस्थेतील पक्षी शास्त्रज्ञ डॉ. शिरीष मंची यांनी भारतीय पाकोळीच्या संवर्धनातील समस्यावर लक्ष केंद्रित केले, तसेच त्यांनी कोकण किनारपट्टीवर चालू करण्यात येणार असलेल्या प्रकल्पाची माहिती दिली आणि इच्छुक लोकांना सोबत येण्याचे आवाहन केले

**सत्र २ रे – प्रकट मुलाखत – सूत्रसंचालक : डॉ. जयंत वडतकर**

राज्याचे अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, वन्यजीव (पश्चिम) सुनील लिमये यांची प्रकट मुलाखत विशेष लक्षवेधी ठरली. यावेळी त्यांनी भविष्यातील पक्षी संवर्धनाच्या विविध बाबींवर आणि महाराष्ट्र पक्षीमित्र व वनविभागाचा समन्वय यावर भाष्य केले. यावेळी पक्षिमित्र संघटनेचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर यांनी मुलाखतकाराची भूमिका बजावली. 'राज्यातील धडाडीचे वनाधिकारी' म्हणून लिमये ओळखले जातात. या मुलाखतीच्या वेळीही त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची मनमोकळेपणाने उत्तरे दिली. केवळ 'पक्षीसंवर्धन' या विषयाला केंद्रस्थानी न ठेवता, राज्यातील वन्यजीव व्यवस्थापनासंबंधीच्या विविध प्रश्नांनाही त्यांनी मनमोकळेपणे उत्तरे दिली. तसेच पुढील वर्षापासून वन विभागाचा वन्यजीव विभाग हा पक्षिमित्र संघटनेसोबत समन्वय साधून पक्षीमित्र संमेलनाचे आयोजन करण्यात सहभागी होईल, अशी ग्वाही यावेळी श्री. लिमयेंनी दिली.

**सत्र ३ रे –खुले चर्चासत्र– सूत्रसंचालक : निखिल भोपळे**

संमेलनात नवीन उपक्रमांमध्ये खुल्या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या सत्रात १०० जणांनी आवर्जून सहभाग घेतला. या चर्चासत्रात ८ संघांमध्ये प्रत्येक संघात ८ ते १२ जणांनी सहभाग घेतला. या संघांना ३ विषय देण्यात आले होते व त्यांनी या विषयांवर चर्चा केली. या चर्चा सत्राचे प्रमुख विषय १. पक्ष्यांचे छायाचित्रीकरण २. बर्ड फीडिंग ३. कृत्रिम घरटी

प्रत्येक संघाने प्रत्येकी ३० मिनिटे चर्चा केली. प्रत्येक संघाला व्यासपीठावर आपल्या चर्चेतून निष्पन्न झालेले मुद्दे सादर करण्यासाठी ५ मिनिटे एवढा वेळ देण्यात आला होता. त्यातूनच मांडलेले काही महत्त्वपूर्ण मुद्दे :–

१. छायाचित्रणासाठी नियमावली आवश्यक असून त्यात पक्ष्यांच्या घरट्याचे व लहान पिल्लांचे, त्यांना त्रास होईल, अशा प्रकारे छायाचित्रीकरण करू नये

२. पक्ष्यांना धान्य आणि अन्न खाऊ घातल्यामुळे त्यांचे नैसर्गिक / उपजत ज्ञान नष्ट होऊन त्यांचा जीवनक्रम बदलण्याचा धोका होऊ शकतो अशी खंत व्यक्त केली.

३. जर एखादा पक्षी आजारी असेल किंवा त्याला उडता येत नसेल तरच त्याला कृत्रिमरीत्या अन्न द्यावे असे देखील सांगितले.

**सत्र ४ थे – पक्षी अभ्यास आणि तंत्रज्ञान, सूत्रसंचालक : श्री. किशोर रिठे**

१. इंटरनेट ऑफ बर्डस –ॲप्लिकेशन – ह्या नवीन ॲपबद्दल माहिती सागर महाजन ह्यांनी दिली.

२. ई – बर्ड–ॲप्लिकेशन – ई – बर्ड हे ॲप कसे काम करते आणि ते कसे वापरावे हे पूजा पवार हिने सांगितले.

३. ई–बर्डवरील माहितीची गुणवत्ता व खातरजमा – ई – बर्ड मध्ये जमा झालेला डाटा कसा वापरता येईल त्याचे महत्व मित्तल गाला हिने सांगितले.

४. सारस स्केप –सारसगाथा – सावन बाहेकर गोंदिया, ह्यांनी गोंदियातील सारस याबद्दल कथन केले.

**सत्र ५ वे – पक्षी वीण, अभ्यास व उपचार सूत्रसंचालक : श्री. अनिल माळी, नाशिक**

१. रेषाळ वटवट्याची वीण – मिलिंद सावदेकर यांनी रेषाळ वटवट्यावर सादरीकरण केले

२. स्वर्गीय नर्तकाच्या पिल्लाचे पुनर्वसन –राजपाल सिंग यांनी स्वर्गीय नर्तकाच्या पिल्लांना कसे नवे जीवन दिले ह्याबद्दल माहिती दिली

३. मोठा कारवानाक – राहुल वाकरे यांनी सतत सहा महिने मोठा कारवानकाचे निरिक्षण केले, त्यांनी निरिक्षण केलेले चित्रीकरण खूप सुंदर होते.

**सत्र ६ वे – पक्ष्याचे आवाज व अभ्यास सूत्रसंचालक : डॉ. शिरीष मंची**

१. पक्षी आवाज ध्वनीमुद्रण साहित्य – पक्षी आवाज रेकॉर्ड करण्यासाठी कुठले साहित्य वापरतात हे शरद आपटे यांनी सांगितले

२. पक्ष्याचे आवाज व त्याचा अभ्यास – शशी मेनन ह्यांनी पक्ष्याचे आवाज व त्याचा अभ्यास कसा करावा यावर सादरीकरण केले

**सत्र ७ वे –पक्षी वैविध्य व संवर्धन, सूत्रसंचालक : श्री. अनिल महाजन**

१. बोरगडच्या महाराष्ट्रातील पहिल्या संवर्धन क्षेत्रातील पक्षी विविधता –प्रतीक्षा व पूजा कोठुळे हयांनी महाराष्ट्रातील पहिल्या बोरगडच्या संवर्धन क्षेत्रातील पक्षी विविधता ह्या वर सादरीकरण केले

२. अवतीभवतीचे पक्षी –दिलीप बागल यांनी हॉस्पिटलमध्येसुद्धा पक्ष्यांना कश्या प्रकारे मदत करता येईल हे सांगून त्यांच्या निरीक्षणच्या नोंदणी सादर केल्या.

३. सारस संरक्षण व संवर्धन – मुकुंद धुर्वेयांनी त्याचा सारससंदर्भातील अनुभव सांगितला.

४. पक्ष्यांच्या उप प्रजातीचे स्थलांतर – किरण मोरे यांनी पक्ष्याच्या उप प्रजातीचे स्थलांतर कसे होते ते सांगितले

**प्रश्नमंजुषा स्पर्धा : पक्षी ओळखा – सूत्रसंचालक : डॉ. अमोल पाटील**

पक्षी ओळखा –डॉ. अमोल पाटील यांनी पक्ष्याचा संदर्भात एक आगळी वेगळी स्पर्धा घेतली आणि लोकांनी त्याला भरपूर प्रतिसाद दिला.

**सत्र ८: स्व.प्रकाश गोळे स्मृती व्याख्यान आणि इतर: वृक्ष आणि पक्षी संवाद**

१. स्व. प्रकाश गोळे स्मृती व्याख्यानांतर्गत संमेलनाध्यक्ष डॉ. राजू कसंबे यांचे व्याख्यान झाले. झाड आणि पक्ष्यांची असलेली मैत्री यावेळी डॉ. कसंबे यांनी उलगडली. झाडांचे बीजांकुरण करण्यासाठी पक्षी कशा पद्धतीने त्यांना सहकार्य करतात, याविषयीची रंजक माहिती दिली.

२. निसर्गातील अद्भुत तथ्ये – शिवाजी जवरे यांनी निसर्गातील अद्भुत तथ्ये वर सादरीकरण केले




**रुपाली मढवी**

**अमेझींग नेचर, रेवदांडा**

**आयोजक**

# ३३ वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन

३३ वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनाच्या
उद्घाटन प्रसंगी मान्यवर





संमेलनामध्ये मार्गदर्शन करतांना
महाराष्ट्र पक्षिमित्रचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर

३३ वे महाराष्ट्र पक्षिमित्र पुरस्कार जाहिर करतांना
महाराष्ट्र पक्षिमित्रचे कार्यवाहक डॉ. गजानन वाघ






संमेलनाध्यक्ष डॉ. राजु कसंबे आपले
अध्यक्षीय भाषण करतांना

३३ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाच्या
स्मरणीकेचे प्रकाशन





३३ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाचे
उद्घाटक जिल्हाधिकारी डॉ.
उद्घाटनपर भाषण करतांना

'महाराष्ट्र पक्षिमित्र जीवन गौरव पुरस्कार' स्विकारतांना पुणे येथील जेष्ठ पक्षिनिरीक्षक श्री. बाळासाहेब कुळकर्णी





'पक्षी संवर्धन व शुश्रुषा पुरस्कार' स्विकारतांना गोंदिया येथील श्री. मुकूंद धुर्वे

'पक्षी संवर्धन व शुश्रुषा पुरस्कार' स्विकारतांना अमळनेर येथील श्री. अश्विन पाटील





'पक्षिसंशोधन/जनजागृती पुरस्कार' स्विकारतांना जुन्नर येथील श्री. प्रशांत वाघ

वर्धा, नाशिक, मुंबई येथून संमेलनस्थळी पोहचलेल्या सायकलविरांचे स्वागत करतांना मान्यवर





संमेलनातील आकर्षक वाळूशिल्प
शिल्पकार - महेंद्र गावंड व जिज्ञासा थळे

डॉ. गजानन वाघ यांचे
'अमरावती जिल्ह्यातील पाणथळी आणि पाणपक्षी'
या पुस्तकाचे संमेलनात प्रकाशन करतांना मान्यवर






श्री. किरण मोरे यांचे 'माळरानावरील चंडोल' या पुस्तकाचे संमेलनात प्रकाशन करतांना मान्यवर

श्री. सचिन मेन लिखित
'रोजनिधी मोरपिशी आठवणींची'
पुस्तकाचे प्रकाशन करतांना मान्यवर







श्री. निखिल भोपळे लिखित 'वेन इन डाऊट, ट्राय इट आऊट-प्लवर ॲण्ड सॅण्डपायपर' पुस्तकाचे प्रकाशन करतांना मान्यवर




'क्रेक ॲण्ड रेल' या दिनदर्शिकेचे प्रकाशन करतांना मान्यवर

# लोणार येथे २० वे विदर्भ पक्षीमित्र संमेलन

जगप्रसिद्ध लोणार येथे ८ आणि ९ फेब्रुवारीला विसावे विदर्भ पक्षीमित्र संमेलन आयोजित करण्यात आले होते. ज्येष्ठ पक्षी अभ्यासक अजय डोळके हे संमेलनाध्यक्ष होते. आपल्या अध्यक्षीय मनोगतात ते म्हणाले की, पक्ष्यांनी आम्हाला जगाकडे कसे बघावे, भौतिकवादापासून दूर राहावे इत्यादी शिकवण दिली. पण आम्ही पक्ष्यांना त्यांचे मित्र म्हणून काय दिले? असा प्रश्न विचारला असता ते पुढे म्हणाले, पक्ष्यांच्या अधिवासाविषयी आपण सतर्क असले पाहिजे व स्थानिकांशी या संदर्भात आपण सातत्याने संवाद साधला पाहिजे. संमेलनाचे उद्‌घाटन खासदार प्रताप जाधव यांच्या हस्ते पार पडले. लोणारच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध असून मा. मुख्यमंत्र्याकडे आपण याचा पाठपुरावा करू असे आश्वासन त्यांनी याप्रसंगी दिले. महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर यांनी संमेलनामागची पार्श्वभूमी विशद केली. विभागीय वनाधिकारी वन्यजीव विभाग मनोज खैरनार,माजी न्यायाधीश बाळासाहेब सांगळे,तहसीलदार सैफन नदाफ,नगरपालिका उपाध्यक्ष बादशहा खान पठाण, नगरसेवक बळीरामजी मापारी, नंदूभाऊ मापारी आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. लोणार सरोवर व अभयारण्याकरिता केलेल्या प्रयत्नांची सचित्र मांडणी अरुण मापारी व सचिन कापुरे यांनी उद्‌घाटनाच्या वेळेस केली.

लोणारचे पक्षीवैभव व वारसा वृक्ष ही मध्यवर्ती संकल्पना असलेल्या या संमेलनात विश्वनाथ कुळे यांचा 'सरोवराशी जडले नाते' हा माहितीपट दाखविण्यात आला. डॉ जयंत वडतकर–प्राचीन वास्तूंवरील शिल्पांकित पक्षी, डॉ. अरविंद गजभिये– आयुर्वेदातील पक्षिजगत, डॉ. मकरंद गिते– शेती शेतकरी व पक्षी सहसंबंध, मनीष राजनकर– पाणथळ अधिवासासंदर्भात स्थानिक लोकांची भूमिका, मनीष ढाकुलकर– मेळघाटातील घुबडप्रजाती, राहुल वकारे– मोठ्या करवानकाचे प्रजनन जीवशास्त्र, डॉ. संदीप साखरे– कोकीळ आणि शिवलिंग बीज, नितीन मराठे–नागपूर परिसरातील पक्षीजीवन, पूजा पवार– दोन शहरांचा पक्षी लेखाजोखा, श्याम जोशी–बर्ड रेस्क्यू, राजकमल जोब–विदेशातील पक्षी अभ्यास, सुहास जोशी– पाणथळ अधिवास व त्याचे संरक्षण, शिवाजी जवरे– अमेझिंग फॅक्ट्स ऑफ नेचर यांनी सादरीकरण केले. हेमंतकुमार हुकरे भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण यांनी लोणारवर एक डॉक्युमेंटरी सादर केली.

संमेलनानिमित्त स्मरणिका प्रकाशित करण्यात आली. यात विभिन्न पक्षीअभ्यासकांचे लेख असून स्मरणिकेचे देखणे मुखपृष्ठ सुप्रसिद्ध चित्रकार जगन राठोड, लोणार यांनी तयार केले. लोणारचे पक्षिवैभव अधोरेखित करणारी छायाचित्र प्रदर्शनी याप्रसंगी लावण्यात आली होती. बुलढाणा येथील अनिल दातीर यांचा आकाश निरीक्षणाचा कार्यक्रम यावेळी ठेवण्यात आला होता. रविवारी सकाळी पक्षी अभ्यासकांनी लोणार सरोवराला भेट दिली व पक्षिनिरीक्षण केले. सरोवर काठावर असलेल्या प्राचीन मंदिरांची माहिती याप्रसंगी संतोष जाधव, विलास जाधव, सचिन कापुरे व अरुण मापारी यांनी उपस्थितांना करून दिली.

समारोपीय कार्यक्रमात संमेलनाध्यक्ष अजय डोळके, प्रमुख अतिथी प्रा. डॉ. निनाद शहा, महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर, 'मी लोणारकर'चे कार्याध्यक्ष संतोष जाधव व योगिनी डोळके उपस्थित होते. दोन महत्त्वाचे ठराव या संमेलनात पारित करण्यात आले. १) लोणारचा समावेश जागतिक वारसा स्थळात करण्यात यावा. २) लोणारचा समावेश जैवविविधता वारसा स्थळात करण्यात यावा. या ठरावांचे वाचन डॉ. जयंत वडतकर यांनी केले. उपस्थित पक्षीमित्रांशी संवाद साधत प्रा. डॉ. निनाद शहा यांनी सोलापूर येथे होणाऱ्या ३४वे पक्षीमित्र संमेलनाचे निमंत्रण दिले. कार्यक्रमाचे संचालन अरुण मापारी यांनी केले तर आभार विलास जाधव व सचिन कापुरे यांनी मानले. या संमेलनात विदर्भ व विदर्भाबाहेरील एकूण १५० पक्षी मित्रांनी उपस्थिती लावली.

'मी लोणारकरांनी' संमेलनाचे सुंदर व नेटके आयोजन केले. प्रभावी सादरीकरण, सुंदर आयोजन व देखणे लोणार, यामुळे हे संमेलन दीर्घकाळ स्मरणात राहील.

महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेच्या वतीने सुंदर आयोजनाबद्दल 'मी लोणारकर' चमूचे आभार मानण्यात आले.

लोणारचा समावेश जैवविविधता वारसा स्थळात करण्याकरिता महाराष्ट्र पक्षीमित्र संघटना विदर्भ विभाग व 'मी लोणारकर' यांच्या संयुक्त विद्यमाने प्रस्ताव सदस्य सचिव महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ यांना पाठविणार आहे.

**वारसा ते वारसा सायकल यात्रा**

या संमेलनानिमित्त बहार नेचर फाऊंडेशनद्वारा सेवाग्राम ते लोणार या सायकल यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. सायकल यात्रेत किशोर वानखडे व दिलीप वीरखडे हे दोन सायकल स्वार सहभागी झाले. ५ फेब्रुवारीला निघालेली सायकल यात्रा तीनशे किलोमीटरचा प्रवास करून ८ फेब्रुवारीला संमेलनस्थळी पोहोचली.

**दिलीप वीरखडे**
विदर्भ समन्वयक, महाराष्ट्र पक्षिमित्र



जगप्रसिद्ध लोणार सरोवर

दैत्यसुदन मंदिर, लोणार






## २० वे विदर्भ पक्षीमित्र संमेलन

संमेलनाचे उद्घाटन करतांना
बुलढाणा जिल्ह्याचे खासदार
मा. प्रतापराव जाधव व मान्यवर





संमेलनाचे अध्यक्ष जेष्ठ पक्षिअभ्यासक
श्री. अजय डोळके आपले
अध्यक्षीय भाषण करतांना

२० व्या विदर्भ पक्षिमित्र संमेलनाच्या
स्मरणीकेचे प्रकाशन करतांना मान्यवर





संमेलनाचे उद्घाटक
मा. खासदार श्री. प्रतापराव जाधव
उद्घाटनपर मार्गदर्शन करतांना

# तिसरे उत्तर महाराष्ट्र विभागीय पक्षीमित्र संमेलन

२ फेब्रुवारी हा दिवस दरवर्षी जागतिक पाणथळ दिन म्हणून साजरा करण्यात येतो. हे औचित्य साधूनच दि. १,२ फेब्रुवारी २०२० असे २ दिवस उत्तर महाराष्ट्र विभागीय पक्षीमित्र संमेलनाचे आयोजन जळगाव शहराबाहेरील 'गांधी तीर्थ जैन हिल्स' या अतिशय निसर्गरम्य शांत व पवित्र स्थळी करण्यात आले होते.

संमेलनाध्यक्ष म्हणून नाशिकचे पक्षीमित्र, वन्यजीव छायाचित्रकार श्री. अनिल माळी यांची निवड करण्यात आली.

हे संमेलन द्वैवार्षिक असून यापूर्वीचे संमेलन बारपाडा येथे झाले होते. त्याचे अध्यक्षपद नगरचे डॉ. सुधाकर कुऱ्हाडे यांचेकडे होते. उद्घाटन सत्रात डॉ. कुऱ्हाडे यांनी पाणथळीचे संवर्धन याविषयी आपले विचार मांडले. उजनी पक्ष्यांसाठी समृद्ध आहे. लाणार अनेक बाबीत बसत नाही. परंतु भूगर्भशास्त्रीय दृष्टिकोनातून ते जगातील एकमेव सरोवर असल्याने पाणथळ होण्यात अडचण नाही. हातनूर पाणथळ होण्यासाठी काम करायचे आहे. प्रत्येक जिल्ह्याची पक्ष्यांची चेकलिस्ट करायची आहे. धुळे नंदुरबारने आपापली चेकलिस्ट तयार केली पाहिजे. ही माहिती पाटबंधारे विभागाकडे मिळेल. पाणथळींचा आधी अभ्यास करून नंतर त्या सुदृढ केल्या पाहिजेत.

यानंतर डॉ. कुऱ्हाडे यांनी श्री. अनिल माळींना पक्ष्याचे घरटे देऊन अध्यक्षपदाची सूत्रे प्रदान केली. श्री. अनिल माळींनी आपले मनोगत व्यक्त केले. पक्ष्यांशी बांधिलकी म्हणून संमेलन होत. नांदुरला रामसर दर्जा मिळाला. नाशिक व निफाडच्या पक्षिमित्रांचा याला हातभार लागला. पाणथळीबाबात जागरूकता नाही. तिचा निसर्गातील भूमिका समजून घेतली पाहिजे. महत्त्वाची अन्नसाखळी म्हणून सर्व सजीवांसाठी महत्त्वाची ठरते. तलावात गाळ साचल्याने तलावाची खोली कमी होत. दलदलीत व उथळ ठिकाणीच पक्षी जास्त दिसतात. पाणथळींवर सांडपाण्याचे प्रमाण वाढल्याने ब्लॅक विंगड् स्टिल्ट हा पक्षी दिसतो. डार्टर स्वच्छ पाण्यात पोहोतो. मासे पकडतो. गढूळ पाण्यामुळे त्याला मासा दिसत नाही. त्यामुळे हा पक्षी दिसेनासा झाला आहे. सांडपाण्याचा निचरा नीट होण्याची गरज आहे.

शास्त्रीय दृष्टिकोनातून उत्तर महाराष्ट्राची पक्षिसंपदा पाहिल्यास जळगाव ३७१, नगर ३१४, नाशिक ३४५, धुळे २८८ प्रजातींची नोंद आहे. पक्षीदृष्ट्या उत्तर महाराष्ट्र संपन्न म्हणून त्यांचे अधिवास राखावेत. पक्ष्यांविषयक छोटासा अभ्यासक्रम तयार करून विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवता येईल. शालेय विद्यार्थ्यांना पक्षिनिरीक्षणाची सवय लावावी.

अतिशय कमी खर्चात विद्यार्थी व शेतकऱ्यांची पक्षिमित्र संमेलने भरवावीत. जेवणाचा डबा प्रत्येकाने स्वत:च्याच घरून आणावा. कीटकनाशके, उंदीर आदी विषयात प्रत्यक्षात शेतकऱ्यांचा सहभाग वाढवता येईल.

'पुढील २ वर्षांसाठी ५ पक्ष्यांची निवड करून त्यांचा अभ्यास करावा. डब्लू डब्लू एफ च्या अहवालानुसार पुढील ७ वर्षात ८०% पक्षिप्रजाती नष्ट होण्याचा मार्गावर असतील', असे विचार सर्पमित्र नीलमकुमार खैरे यांनी व्यक्त केले आहेत. पाणथळींचे संवर्धन जनजागरण करून ठोस काम उभे करूया.

जळगावाचे पक्षीमित्र श्री. अभय उजागरे हे वाघुर येथील पहिल्या संमेलनाचे अध्यक्ष होते.त्यांनी आपले विचार मांडले.

१६ आक्टोबर १९७९ ला त्यांनी पक्ष्यांविषयक कामास सुरूवात केली. पहिल्या ब्राह्मणी डकची त्यांनी नोंद केली. जळगाव जिल्ह्यात ४३६ प्रजाती आहेत. जैवविविधता भरपूर आहे. वाघ, बिबट्या, रानमांजर, उडणारी खार, पाणमांजर, उदमांजर, काळ्या मानेचा ससा आहे. सध्या ते नॉर्थ इस्टला काम करीत आहेत. मानस नॅशनल पार्क वर त्यांनी पुस्तक लिहिले आहे. नामढापा नॅशनल पार्कमध्ये लवकरच बटरफ्लाय फेस्टिवल होत आहे. बी.एन.एच. एस चे माजी अध्यक्ष श्री. आयझॅक किहीमकर हजर राहाणार आहेत. जळगावने त्यासाठी २ लाख रूपये निधी दिला आहे.

श्री. उजागरेंना नागालँड राज्यात बोलावले आहे. त्यांच्या पुस्तकास प्रस्तावना व संदेश केंद्र व राज्याचे पर्यावरणमंत्री अनुक्रमे श्री. प्रकाश जावडेकर व श्री. आदित्य ठाकरे लिहिणार आहेत.

नांदुरमध्यमेश्वरला काम करणारे श्री. अशोक काळे यांनी पूर्वी येवला तालुक्यातील राजापुरला काळवीटसंवर्धनात काम केले. ते म्हणाले, 'डॉ. कुऱ्हाडेंच्या मार्गदर्शनाखाली प्रशांत वाघने काम केले. त्याचाच आम्हाला उपयोग होत आहे. उगावकरांच्या मार्गदर्शनाखाली दर महिन्याला आम्ही पण्यांचा नोंदी घेतो. २००८ ला तिथे राज्य पक्षी मित्र संमेलन भरले होते. त्यावेळी काहीच सुविधा नव्हत्या. त्यानंतर पक्षीनिरीक्षण ट्रेल्स, वॉच टॉवर्स राहाण्याच्या सोयी आहेत. व्हाईट टेल्ड लॅपविंग व्हाईट टेल्ड इगल, ग्रास वार्बलर या नांदूरच्या नवीन नोंदी आहेत. वन्यजीव अभ्यासक पक्षिमित्रांनी हे शोध लावले आहेत.

नांदूरमध्यमेश्वर हे महाराष्ट्रातील पहिले, भारतातील ३१ वे व संबंध जगातील २४१० वे पाणथळी असल्याचे त्यांनी सांगितले. यानंतर जळगावचे डॉ. गायकवाड यांची जखमी पक्ष्यांवर केलेले उपचार यावरील फिल्म दाखवली गेली. गुजरातला काईट फेस्टीवल होतो. त्यावेळी जखमी पक्ष्यांच्या नोंदी घेऊन तसा अहवाल तयार केला जातो. आपणही अशा नोंदी करून त्या सायन्टिफिक जनरलमध्ये आल्या पाहिजेत, असे सांगण्यात आले.

जखमी पक्ष्यांना मल्टीविटॅमिन ड्रॉप्स, प्रोटीन पावडर पाण्यात टाकून पाजणे, चिकनचे बारीक तुकडे खायला देणे यामुळे फायदा होत असल्याचे सांगितले.

सर्वांनी रविवार दि. २ सप्टेंबरला सकाळी ७ ते ९ या वेळात गांधीतीर्थाभोवती चक्कर मारून झाडावरील व पाण्यातील पक्ष्यांचे निरीक्षण केले. गांधीतीर्थावर जागतिक पाणथळीदिन साजरा केला. यावेळी श्री. माळी, डॉ. कुऱ्हाडे, श्री. उजागरेंनी आपापले विचार मांडले.

गिर्यारोहक, पत्रकार व दरवर्षी गिरीमित्र साहित्य संमेलन भरवणारे श्री. सुहास जोशी यांनी दुर्लक्षांच्या दलदलीत–पाणथळ जागांचे वास्तव, या विषयावर सादरीकरण केले.

अतिक्रमण, दुर्लक्ष कचरा, सांडपाणी राडारोडा, बांधकाम हे सद्य:स्थितीत पाणथळींना धोके असल्याचे सांगितले. भराव घालून पाणथळ नाहीसे झाले. विकासकामे सुरू आहेत. पक्षी नाहीत. डोंबिविलीजवळचा खोणी तलाव झाकलेला आहे. निळजे येथील तलाव गावचा धोबीघाट झाला आहे. कांदिवली चारकोपजवळचा तलझान तलाव कचऱ्याने भरला आहे. पनवेलचा बल्लाळेश्वर तलाव दलदलीने भरलेला आहे. सोलापूरचा कमळ तलाव भरून गेला आहे.

अहमदाबादला २३ देशातील पाणथळींचा अभ्यास झाला. मुंबईच्या ७१% कमी झाल्या. २००५ चा मुंबईचा महापुर, २०१४ ची चेन्नईची पूरस्थिती प्लास्टीकमुळे झाली होती. भारतात वेगाने पाणथळी नाहीशा होत आहेत. १ चौरस किलोमीटर बांधकामात २५ हेक्टर पाणथळींचा नाश होतो. २०१७ मध्ये पाणथळ  निवारण समितीची स्थापना झाली, ती उच्च न्यायालयाच्या आदेशावरून. लोकसहभागातून पाणथळींचे संरक्षण झाले पाहिजे.

'चातक निसर्गसंवर्धन संस्था', वरणगावचे श्री. अनिल महाजन यांच्या सादरीकरणाचा विषय होता. हातनूर धरण पाणथळसाठी का गरजेचे आहे? चांगदेवला तापी–पूर्णा संगम होतो नोव्हेंबरमध्ये बदके येतात. पोचार्ड येतात. उन्हाळा सुरू झाल्यावर बेटे तयार होतात. स्थलांतरीत पक्षी जातात. स्थानिक पक्षी वाढतात. जांभळ्या कॉयबडीचे प्रजनन होते. जवळच ग्रासलॅन्ड आहे. ३०९ प्रजातींची नोंद झाली आहे. जवळच डोलारखेडा जंगल आहे. ओरिएन्टल रीड वार्बलर इथे सापडला यापूर्वी बंगालला सापडला होता. रेड फालरोप पहिल्यांदा आला.

निसर्गववेध संस्था धुळे येथील डॉ. विनोद भागवत यांनी पक्षिप्रसारित आजार या विषयावर सादरीकरण केले. ६० पक्ष्यांच्या प्रजाती विविध आजार पसरवितात. पोल्ट्रीत काम करणारे कर्मचारी मजूर, जनावरांचे डॉक्टर, पक्षी हाताळणारे, वन्यजीव अधिकारी पक्षिनिरीक्षक इत्यादींना धोका होतो. हवापाण्याने संसर्ग होतो. मास्क, हॅण्ड ग्लोव्हस् वापरावेत.

जळगावच्या अग्निपंख संस्थेचे श्री. इम्रान तडवी यांनी गाय, बगळा या पक्ष्यांच्या जगण्याचा संघर्ष पक्षिमित्रांना दाखवला. मानव व पक्षी संघर्ष, मानव वाढती लोकसंख्या, मानव व वाढत्या गरजा ह्यांचे प्रतीकात्मक असे हे सादरीकरण होते.

कर्नाळा अभ्यायारण्यात 'वनपाल' असलेले श्री. युवराज मराठे यांनी 'तिबोटी खंड्या' विषयांचे सादरीकरण केले. 'तिबोटी खंड्या' मासा खात नाही. १३ सेंटीमीटर लांब असतो, जूनच्या पहिल्या आठवड्यात कोकणात सहज मिळतात. या पक्ष्याचे मातीतले घरटे, अंडी घालणे, चार पिलांना भरवणे इत्यादी छायाचित्रण सुंदररीत्या दाखवले. सुरुवातीला नर मादीला खाद्य आणतो, खाऊ घालतो. नंतर ते आत जातात. अशा चार जोड्या त्यांना मिळाल्या.

श्री. उदय चौधरी यांनी काही पक्ष्यांची सुटका करून काहींवर घरीच उपचार केले. त्याविषयीचे अनुभव कथन केले.

Grey Francolin काटेरी झाडात अडकला होता. त्याच्या पायात धागा होता. Cattle Egret चा पंख तुटला होता. मासेमारीचे जाळे पाणडुबीच्या पायाला अडकले होते. Ashy prinia ला साखरपाणी पाजून, खाण्यास अळ्या दिल्या. जंगलात Brown fish owl ला सरडा मारून खाऊ घातला. ग्लानी आलेली बुलबुल, कोकीळ मादी यांना आंबेरस पाजला. शिक्रा विजेच्या शॉकने खाली पडला. त्याला चिकन खाऊ घातले. हे सर्व करताना मास्क, हातमोजे वापरणे अत्यावश्यक असल्याचे सांगितले.

समारोपाचे भाषण करताना संमेलनाध्यक्ष श्री. अनिल माळींनी कार्यशाळा घ्याव्यात, स्पर्धा घेऊन बक्षिस वितरण करावे. पाच पक्षिप्रजाती ठरवून त्यांचे संरक्षण, संवर्धन करावे. त्यानुसार 1) Vulture, 2) Spotted owlet, 3) Night Jar & species, 4) Muniya, 5) Common pochard हे पाच पक्षी सर्वानुमते ठरविण्यात आले.

यापुढील संमेलन 'तोरणमाळ' इथे होणार असल्याची घोषणा करण्यात आली व संमेलनाचा समारोप झाला.



**डॉ. अरुणा पाटील**
जळगाव
९६८९०१४७३०

उत्तर महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन
उद्‌घाटन कार्यक्रम






संमेलनाचे सूत्र श्री अनिल माळी यांचेकडे
सोपवतांना श्री.डॉ. सुधाकर कुऱ्हाडे

गांधीतीर्थ जळगाव येथील तलावाजवळ
पक्षी निरीक्षणात सहभागी पक्षिमित्र







प्रथम रामसार साईट नांदूर मधमेश्वर
अभयारण्याबद्दल बोलतांना श्री अशोक काळे

वक्ते श्री सुहास जोशी यांचा सत्कार
करतांना संमेलनाध्यक्ष श्री अनिल माळी






संमेलन यशस्वी पार पडल्यानंतर
सामुहीक छायाचित्र

# अहमदनगरची वैशिष्ट्यपूर्ण पक्षिसूची

डॉ. सुधाकर कुऱ्हाडे हे महाराष्ट्रातील पक्षी अभ्यासक आणि पक्षी चळवळीतील एक सर्वश्रुत नाव. गेली ३६ वर्षेप्राणिशास्त्र आणि पर्यावरणशास्त्राच्या अध्यापनाचे काम करीत असलेले डॉ. कुऱ्हाडे सध्या प्रोफेसर आणि विभागप्रमुख म्हणून न्यू आर्टस्, कॉमर्स, सायन्स कॉलेज, शेवगाव (अहमदनगर) येथे कार्यरत आहेत.


नुकतीच प्रकाशित झालेली 'चेकलिस्ट : बर्डस् ऑफ अहमदनगर डिस्ट्रिक्ट' हे सरांचे सहावे पुस्तक. तीस–पस्तीस वर्षेअहमदनगर जिल्ह्यातील विविध पाणथळींवर, गायरानांवर पक्षी निरीक्षण आणि पक्षी अभ्यास करताना त्यांना जे–जे पक्षी पाहावयास मिळाले, त्यांच्या शास्त्रोक्त पद्धतीने नोंदी सरांनी नोंदवहीमध्ये करून ठेवलेल्या आहेत. या नोंदी त्यांनी वेळोवेळी प्रथितयश पक्षिविषयक नियतकालिकांमधून प्रसिद्धही केलेल्या आहेत. याशिवाय जिल्ह्यातील इतर पक्षी मित्रांनी घेतलेल्या नोंदीही सरांनी खात्री करून तपासून घेतल्या असून अशा सर्व ३१४ पक्ष्यांची सूची या पुस्तिकेत देण्यात आली आहे.

ही संदर्भसूची तयार करताना त्यांनी अहमदनगर जिल्ह्याचा निसर्ग इतिहासदेखील थोडक्यात मांडलेला आहे. यामध्ये अहमदनगर जिल्ह्याची भौगोलिक रचना, डोंगरदऱ्या, नद्या, भूगर्भशास्त्रीय वैशिष्ट्ये, जमीन, वातावरण, जलसंधारण, भाजीपाला, पिके, वने, जिल्ह्यातील राखीव वनक्षेत्रे, वन्य पशू–पक्षी, सरीसृप याविषयीदेखील थोडक्यात माहिती दिली आहे, जी अभ्यासकांच्या दृष्टीने महत्त्वाची आहे.

पक्षिसूची तयार करताना लेखकाने अगदी अलीकडे, भारतभर सर्वमान्य असलेली पक्षी वर्गीकरण आणि नामप्रणाली वापरली असल्याने ती अद्ययावत झाली आहे. यामध्ये पक्ष्यांचे सामान्य नाव, शास्त्रीय नाव, आययूसीएन कॅटेगरी, स्टेटस् आणि विपुलता दिलेली असल्याने अभ्यासकांना ही सूची उपयुक्त ठरणार आहे.

२०१० मध्ये जळगाव येथे संपन्न झालेल्या २४ व्या महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले असून २०१८ मधील बारीपाडा, तालुका साक्री, जिल्हा धुळे येथे आयोजिलेल्या दुसऱ्या उत्तर महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे. डॉ. सुधाकर कुऱ्हाडे हे महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे संघटक असून अहमदनगर जिल्ह्याचे मानद वन्यजीव रक्षक म्हणूनही कार्यरत आहेत.

त्यांचे कीटक, पक्षी, प्राणी याविषयी विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमधून ७५ शोधनिबंध प्रकाशित झाले असून त्यांनी विविध मासिके, वृत्तपत्रांमधून पक्षी, निसर्ग याविषयी सुमारे २३५ लेख लिहिले आहेत. आकाशवाणी (नगर, पुणे) साठी त्यांनी निसर्गविषयक विविध लिखाण केले असून नांदूर मध्यमेश्वरची 'निसर्गगाथा' या मराठी भाषेतील माहितीपटाची निर्मिती केली आहे.




अहमदनगर जिल्ह्याच्या पक्षिसूचीची नोंद राष्ट्रीय स्तरावरील पक्षी 'डेटाबेस'साठी घेण्यात आली असून महाराष्ट्रातील इतर पक्षी अभ्यासकांनाही ही उपयुक्त आहे. सदर पक्षिसूची नाशिकच्या 'स्वारंभ पब्लिकेशन्स'ने प्रकाशित केली असून मुखपृष्ठावर 'इंडियन इगल आऊल'चे छायाचित्र छापलेले आहे. एकूण पृष्ठसंख्या केवळ ३६ असली तरी आशयाच्या दृष्टीने मोठ्या आवाक्याची आहे.

**अनिल माळी**
नाशिक,
९८५०८१८६४४

## उपक्रम
## जळगाव जिल्ह्यातील १३ पाणथळ जागी पाणथळ पक्षी गणना

सन २०१० म्हणजे गेल्या दहा वर्षांपासून आम्ही दोघे मी व राजेंद्र गाडगीळ, जळगाव शहर पक्ष्यांचा अभ्यास करीत आहोत. तसेच गेल्या तीन वर्षांपासून बीएनएचएस आयोजित पावसाळी, हिवाळी आणि उन्हाळी पक्षी गणनेतही आम्ही सहभाग घेत असतो.

या वर्षीच्या एशियन वॉटर बर्ड सेन्सस (Asian Waterbird Census) मध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार आम्ही या उपक्रमात आमचा सहभाग नोंदवला. यासाठी आम्ही जळगाव शहर परिसरातील मन्यारखेडा शिरसोली, मेहरूण हे तलाव आणि गिरणा नदी काठी म्हणजे निमखेडी व गिरणा पंपिंग, वाघुर धरण या पाणथळ ठिकाणी तसेच जळगाव जिल्ह्यातील एरंडोल तालुक्यातील अंजनी, गणेश तांडा–खडके सीम, खडके खुर्द, पाचोरा तालुक्यातील बहुळा धरण, जामनेर तालुक्यातील शहापूर, पिंपळगाव, वाकडी या पाणथळ जागांची निवड केली. अशा या १३ पाणथळ ग्रीडमध्ये आम्ही ही गणना केली.

ही एशियन वॉटर बर्ड सेन्सस दरवर्षी जानेवारी महिन्यात करण्यात येते. या गणनेची सुरुवात सन १९८७ पासून झाली. या वर्षीची आशियाई पाणथळ पक्षी गणना दि. १० ते १६ जानेवारी २०२० मध्ये मध्ये घेण्यात आली.

या गणनेत नयनसरी–(कॉमन पोचार्ड), मोती लालसरी (रेड क्रेस्टेड पोचार्ड), चक्रांग बदक (ग्रीन विंग टील), थापट्या (नॉर्दर्न– शोवलर), नकट्या(नॉक्बील डक), दलदल हारीण (मार्श हरीअर), तलवार बदक (पिनटेल), ठिपकेवाली तुतारी (वुड सॅंडपायपर), प्लवर, उघडचोच (ओपन बील), रंगीत(पेंटेड) आणि युरेशियन चमचा (स्पून बील) हे करकोचे, काळ्या डोक्याचा शराटी (ब्लॅक हेडेड आईबिस), तिरंदाज (डार्टर), राखी ढोकरी (ग्रे हेरॉन) अशा या हिवाळी देशी–विदेशी पाणथळ पक्ष्यांची नोंद झाली.

या १३ ग्रीड पैकी शाहपूर तलावावर सर्वात जास्त म्हणजे ३७ जातीचे तर मेहरूण तलावावर सर्वात कमी म्हणजे फक्त ७ जातीचे पाणथळ पक्षी आढळले. एकूण संख्या शाहपूर येथे जास्त म्हणजे ४८५ तर आणि वाकडी तलाव जामनेर येथे सर्वात कमी म्हणजे १२ जातीचे मिळून फक्त ४८ पक्ष्यांची नोंद झाली. या गणनेत वारकरी (युरेशियन कूट)– ६१२ त्या खालोखाल लहान पाणकावळा (लिटील कार्मोरंट)–४३२ आणि शेकाट्या (ब्ल्याकविंग स्टीष्ट)– २२२ या जातीचे पक्षी जास्त संख्येने आढळले.

**विशेष उपलब्धी**

खडके सीम तलावावर पोची(सॅडरलींग) हा समुद्र किनारी राहणाऱ्या विदेशी पक्ष्याची नोंद झाली, तसेच जळगाव परिसरात क्वचित आणि संख्येने कमी दिसणारा रातबगळा (ब्लाक्क्राऊन नाईट हेरॉन )या पक्ष्यांचा खूप मोठा थवा खड्के खुर्द येथे एकाच जागी दिसला. निमखेडी गिरणा काठी पक्ष्यांची संख्या खूप घटली. येथे फक्त शेकाटे जास्त(१०५) दिसून आले. निरीक्षणातून दिसून आलेल्या बाबी :– यावर्षी विदेशी व स्थानिक स्थलांतरित पक्ष्यांनी फारच अल्प हजेरी लावली आहे. याचे मुख्य कारण या वर्षी पाऊस मोठ्या प्रमाणात आणि दीर्घकाळ बरसला त्यामुळे या काळात जवळजवळ सर्व तलाव, धरणं अशा पाणथळ जागा तुडूंब भरल्यामुळे अजून हवे तसे दलदल क्षेत्र तयार झालेले नाही. एकूणच हवामानाचा बदल, गाळ काढण्याच्या नादात पाणवठ्याचे अति खोलीकरण केल्यामुळे या पक्ष्यांना उतरण्यासाठीची सोयीची आणि सुरक्षित असणारी तेथील नैसर्गिक उंचवटे, छोटीछोटी बेटं नाहीशी झालेली दिसली. मानवाचा वावर खूप वाढला आहे. नदीपात्रात वाळू उपसा सुरू असल्याने आणि तलावांमध्ये मासेमारी सुरू असल्याने पक्ष्यांनी दुसरा सुरक्षित आसरा शोधला असावा.














शिल्पा गाडगीळ, जळगाव
(मोबाइल : ९३७०२५६५५२)

# दोन पुस्तकांच्या निमित्ताने दोन शब्द

पक्षिसंवर्धनाच्या वाटेवरील राज्यस्तरीय पक्षीमित्र संमेलनासारख्या संकल्पनेची कधीतरी एकल सुरुवात करणारा महाराष्ट्र आज या दिशेने सातत्याने साधारणपणे ३५ वर्षांपासून अग्रगामी असलेला दिसून येतो. नुकत्याच रेवदंडा येथे पार पडलेल्या ३३ व्या महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनाच्या व्यासपीठावर एकाच वेळी, एकाच शहरातील दोन पक्षिअभ्यासकांच्या दोन वेगवेगळ्या पुस्तकांचे अनावरण होणे ह्या संकेताला वेगळे महत्त्व आहे. हा दुग्धशर्करा योग ज्यांच्यामुळे जुळून आला ते दोन्ही लेखक अमरावती सारख्या छोट्या शहरात वास्तव्य करणारे आहेत यावरून महाराष्ट्रात पक्षिसंवर्धन चळवळीची पाळेमुळे खोलवर रुजू पहात आहेत असे आशादायी चित्र उभे होते. ही दोन्ही पुस्तके नुकतीच माझ्या वाचनात आली. आणि त्या पुस्तकांबद्दल वाचकांपर्यंत काही बाबी पोहोचवाव्यात म्हणून हा खटाटोप.

पहिले पुस्तक 'माळरानावरील चंडोल' चे लेखक आहेत श्री. किरण मोरे.

खरं तर 'माळरानावरील चंडोल' या पुस्तकाची ई–आवृत्ती लेखकाने २०१९ सालीच वाचकांसाठी उपलब्ध करून दिली होती. हे डिजिटल युग असले आणि तसे असण्याचे अनेक फायदे किंवा कारणे असली तरी अशी डिजिटल रूपातील साहित्यकृती खऱ्या अर्थाने मनाला 'अस्पर्श' च राहून जाते, असे माझे वैयक्तिक मत आहे. साहित्याच्या या डिजिटल रूपाशी आपलेपणाची भावना, आपल्या मालकी हक्काची जाणीव जुळतच नाही. नेमकी हीच कमतरता भरून काढण्याचे काम या 'प्रत्यक्ष आवृत्ती'ने पूर्ण केले आहे.

पुस्तक हाती येताच पुन्हा वाचून काढले. पाने बोटांनी पलटवण्याचे सुख पुरेपूर अनुभवत, एकएका शब्द, वाक्य आणि चित्राला स्पर्श करत लेखकासोबत त्याच्या अभ्यासाचा सहप्रवासी झाल्याची अनुभूती घेतली.

चंडोल सारख्या दिसायला अतिशय साधारण आणि त्यामुळेच कुठलेही वलय न लाभलेल्या दुर्लक्षित पक्षी–प्रजातीबद्दल अत्यंत परिश्रम घेऊन केलेला हा तब्बल ४ वर्षांचा अभ्यास पुस्तकरूपाने मांडताना लेखक कुठेही कमी पडत नाही.

श्री. निनाद अभंग यांनी तयार केलेले देखणे आणि आकर्षक मुखपृष्ठ वाचकाच्या मनाची पहिली पकड घेते. चंडोलच्या १२ प्रजातींची अभ्यासपूर्ण सचित्र ओळख करून देताना त्यांची मराठी, इंग्रजी आणि शास्त्रीय नावे, आकार आणि आढळ दर्शवणारे नकाशे प्रत्येकवेळी देऊन वाचकांचा अभ्यास अधिक सुलभ केलेला दिसून येतो.

'सारखेपणाचा गोंधळ' या सारखे प्रकरण वाचकामध्ये त्याच्या नकळत पक्षिनिरीक्षण करण्याची उत्सुकता निर्माण करते.

'दुर्मीळता', 'स्थलांतर', 'खानपान' आणि 'घरटे व प्रजनन' ही प्रकरणे या प्रजातीची सखोल माहिती पुरवतात, तर वेगाने होत जाणाऱ्या अपरिहार्य शहरीकरणामुळे चंडोल च्या भविष्यातील अस्तित्वाबद्दल चिंता व्यक्त करण्यासाठी लेखक 'अधिवास व त्यातील धोके' या प्रकरणात सूचक भाष्य करतो.

या सर्वांमध्ये निव्वळ अभ्यासक वाटणारा लेखक 'नक्कल नावाची अक्कल' या प्रकरणात खऱ्या अर्थाने लेखक म्हणून अधिक खुलतो असे कुठेतरी वाटत राहते. चंडोल च्या नक्कलीचा विषय मोठ्या सहजेने आणि खुमासदारपणे तो मांडतो. किरण आणि निनाद यांनी या विषयावर चित्रित केलेल्या माहितीपटाच्या निर्मितीचा प्रवास मनोरंजक पद्धतीने मांडून पुस्तकाचा शेवट करतांना भविष्यात किरण एक अभ्यासू आणि वाचकाभिमुख लेखक म्हणून आशादायी चित्र उभे करतो एवढे नक्की.

या मालिकेतील दुसरे पुस्तक म्हणजे प्रा. डॉ. गजानन वाघ लिखित 'अमरावती जिल्ह्यातील पाणथळी आणि पाणपक्षी'.


मुखपृष्ठावरील आकर्षक रंगीत करकोच्याचे छायाचित्र प्रथमदर्शनी चित्त वेधून घेते. एकूण पाच सुटसुटीत प्रकरणांच्या शृंखलेत बांधलेल्या या पुस्तकाच्या पहिल्याच प्रकरणात पाणथळीच्या ठिकाणी आढळणाऱ्या पक्ष्यांचे स्थानिक व स्थलांतरित असे वर्गीकरण करून आणि अन्न भक्षण करण्याच्या पध्दतीवरून वर्गीकरण मांडून लेखक वाचकाला शास्त्रबद्ध विचार करूनच वाचनाच्या प्रवासाला नेतो. याच प्रकरणात पक्ष्यांचा एक महत्वाचा अधिवास म्हणून जल परिसंस्था जपण्याचे आवाहन करीत तिला असणाऱ्या धोक्याची आगामी सूचनाही देतो. अमरावती जिल्ह्यातील पाणपक्षी निरीक्षणाची तब्बल चोवीस स्थळांची भौगोलिक माहिती अक्षांश रेखांशासह 'पाणथळी' या प्रकरणात वाचताना लेखकाच्या साधारणपणे २० वर्ष सातत्याने केलेल्या अभ्यासाची प्रचिती येत राहते. कोणत्या ठिकाणी कोणत्या प्रकारचे पक्षी प्रामुख्याने आढळतात याची सूची वाचताना खजिना हाती आल्याचा भास न झाल्यासच नवल. 'पाणपक्षी' हे प्रकरण तर अधिक आकर्षक आहे. एकूण ११४ पक्ष्यांची फिल्ड गाईड म्हणता येईल एवढे सुटसुटीत.

विविध बदक प्रजाती, करकोचे, धिवर, क्रौंच, पाणकोंबडी, तुतारी आणि सुरय इत्यादी पक्ष्यांची छायाचित्रासहित ओळख, आकारमान, अधिवास आणि सद्यस्थितीबाबत तक्ता पध्दतीने केलेली मांडणी जणू एखाद्याला दिशादर्शक ठरावी आणि पक्षी निरीक्षणाला जाताना ही माहिती सोबत ठेवणे अत्यावश्यक बाब वाटावी.


लेखक स्वतः उत्तम छायाचित्रकार सुद्धा आहेत. त्यामुळे पुस्तकातील छायाचित्रे आणि एकूणच पुस्तकाची बांधणी सुबक व दर्जेदार झाली आहे. अमरावती जिल्ह्यातील पक्षी निरीक्षण स्थळांचा नकाशा, जिल्ह्याची संक्षिप्त माहिती, संकटग्रस्त पाणपक्ष्यांची आणि स्थलांतरित पक्ष्यांचे हवाई मार्ग या प्रकारच्या माहितीमुळे लेखकाच्या २० वर्ष अथक अभ्यासाची आणि पूरक छायाचित्रणाच्या मेहनतीची जाणीव होते. खरं तर पुस्तकाच्या शीर्षकानुसार ही सर्व माहिती केवळ अमरावती जिल्ह्याशी संबंधित वाटत असली तरी महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागात सर्वसामान्यपणे आढळणारे पक्षी यात समाविष्ट केलेले दिसतात. त्यामुळे हे पुस्तक केवळ अमरावती जिल्ह्यापुरते मर्यादित न राहता संपूर्ण राज्याच्या पाणथळ भागाचे प्रतिनिधित्व करते.

वरील दोन्ही पुस्तक निर्मितीचा उद्देश आणि जातकुळी वेगवेगळी असली तरी पहिले पुस्तक एका पक्षी प्रजातीबद्दल अभ्यासात्मक बारकावे सांगून एका सामान्य प्रजातीबद्दल उत्सुकता निर्माण करते तर दुसरे पुस्तक हौशी भटकंती करणारे, पक्षिनिरीक्षक, पक्षिअभ्यासक किंवा पक्षिछायाचित्रणाची आवड असणाऱ्या कोणालाही त्यातील सूत्रबद्ध माहितीमुळे निश्चितपणे उपयोगी पडणारे आहे. त्यामुळे पक्षी निरीक्षणाच्या भटकंती दरम्यान पाठीवरच्या सॅक मध्ये या दोन्ही पुस्तकांचा समावेश असावाच असावा.

**मनोज बिंड**
सुप्रसिद्ध वन्यीजीव छायाचित्रकार
अमरावती
८९८३७९५५७२




पुस्तक क्र.१- माळरानावरील चंडोल
लेखक- श्री. किरण मोरे
संपर्क-९९२३९१००३४
प्रकाशक - वन्यजीव व पर्यावरण संस्था, अमरावती
किंमत- रु.१२०/-




पुस्तक क्र.२-
अमरावती जिल्ह्यातील पाणथळी आणि पाणपक्षी
लेखक- प्रा.डॉ.गजानन वाघ
संपर्क-९८२२२०४०७०
प्रकाशक - वन्यजीव व पर्यावरण संस्था, अमरावती
किंमत- रु.१५०/-

## उपक्रम
## निमित्त : जागतिक चिमणी दिनाचे...

शाळेमध्ये शिक्षक म्हणून काम करत असताना अध्यापन हा माझ्या आवडीचा, कामाचा भाग.. परंतु पक्षी व निसर्गविषयक घटक अध्यापन करताना भान हरपून बोलत राहणे, हे आता माझ्यासाठी नित्याचेच झाले आहे. कारण बालपणापासूनच परिसरातील व रानमाळावरील पक्षी बघणे, त्यांच्या आवाजाची नक्कल करणे, त्यांचे स्थानिक ग्रामीण बोली भाषेतील नावे शेतात राबताना आई व आजी कडून जाणून घेणे, चांगलेच अंगवळणी पडले होते. त्याचाच की काय प्रभाव म्हणून पक्षी जगताविषयी वर्गात खूप बोलणे, माहिती सांगणे, वर्गात बसल्या बसल्या मुलांना पक्षी जगतात नेण्याचा प्रयत्न करणे, याचे सवयीत रूपांतर झाले झाले.

माझ्या लाडक्या आजीकडून मिळालेला आवडीचा छंद म्हणजेच चिमण्या, कावळे, साळुंकी, कबूतर, पोपट यासारख्या परिसरात आढळणाऱ्या सामान्य पक्ष्यांना दररोज अन्नधान्य, पाणी घराच्या छतावर उपलब्ध करून देणे. बालवयापासूनच ही छोटीशी कृती करताना खूप आनंद मिळत होता. परंतु दिवसेंदिवस प्रचंड प्रमाणात होत असलेली वृक्षतोड, मातीच्या घरांच्या जागी आलेली सिमेंटची जंगले, वाढते प्रदूषण, आटत चाललेले पाण्याचे नैसर्गिक स्रोत, पक्षी व नैसर्गिक संसाधन बद्दलची वाढती अनास्था यासारख्या एक ना अनेक कारणांमुळे सामान्य पक्षी घटत चाललेले आहेत. म्हणतात ना अतिपरिचयात अवज्ञा. नेहमी दिसणाऱ्या गोष्टींचं खूप महत्त्व राहत नाही. चिमण्यांची संख्या रोडावली परिणामी २०१० सालापासून २० मार्च हा 'वर्ल्ड स्पॅरो डे' साजरा होऊ लागला.

चिमण्या नष्ट होण्याची तीव्रता मला २००६-०७ यावर्षी खूप जाणवली. याच्यावर काय करता येईल म्हणून मी खूप विचार केला. शेवटी एक छोटासा उपक्रम हाती घ्यायचा असे मी ठरवले. मार्च २००७ पासून माझ्या खासगी शिकवणी वर्गातील विद्यार्थ्यांना परिसरातील पक्ष्यांसाठी अन्नपाणी देणे हा उपक्रम सुरू करण्याचे आवाहन केले. पुढील वर्षापासून शाळेतील एका वर्गास या उपक्रमाची माहिती दिली. बालवयातील विद्यार्थ्यांनी हा उपक्रम अतिशय मनापासून केला. स्वतः कुंभाराकडे जाऊन पालकांच्या मदतीने मातीची भांडी आणली. आपल्या घराच्या छतावर, गच्चीत ही भांडी दररोज गार पाण्याने भरून ठेवायची, बाजूला अन्नधान्यदेखील ठेवायचे, हा त्यांनी निर्धारच केला. मार्च ते मे या कालावधीत ही कृती नियमितपणे केली. सुट्टीतील काही कालावधीत चिमुकल्यांच्या अनुपस्थितीत पालकांनी जबाबदारी सांभाळली. पुढल्या वर्षी जून महिन्यात शाळा सुरू झाल्यावर विद्यार्थ्यांनी माझ्याभोवती गराडा घातला. त्यांनी त्यांचे अनुभव आपले मित्र व माझ्यासोबत खूप उत्सुकतेने कथन केले. निष्पापपणे केलेल्या कृतार्थ कार्याचे त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होते. काहींनी त्यांनी पाहिलेले विविध पक्षी, त्यांचा रंग, पिसे, आकार, आवाज, उडण्याची लकब याविषयी दिलखुलास गप्पा केल्या.

विद्यार्थ्यांना पटले की, आपण ही छोटीशी का होईना परंतु अति महत्त्वाची कृती दरवर्षी करावयास हवी. माझा हुरूप व आत्मविश्वास वाढला. पुढील वर्षापासून मी हा उपक्रम शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी सुरू करावा, असे आवाहन केले. याचादेखील प्रत्यय खूप सकारात्मक व दांडगा मिळाला. पुन्हा विद्यार्थ्यांच्या तसेच पालकांच्या, परिसरातील काही संवेदनशील नागरिकांच्या बोलक्या प्रतिक्रिया कानावर येऊ लागल्या. मला खूप हायसे वाटले. या कार्यात प्रबोधन करतानाचा १२ वर्षांचा अनुभव खूपच विचार करण्यास भाग पाडणारा आहे. गेल्या दोन वर्षांपासून विद्यार्थ्यांना मातीची

भांडी व घरटी उपलब्ध करून देण्यात व लावण्यात सक्रीय श्रमिक व आर्थिक योगदान सुरू आहे. तसेच घरच्या घरी साधी सोपी वॉटर फीडर्स कशी बनवायची याचे मार्गदर्शन करत आहे. गेल्या वर्षी स्वखर्चाने ३७७ मातीची भांडी शाळेतील काही विद्यार्थ्यांना, तसेच श्री स्वामी समर्थ केंद्र चोपडा येथे व परिसरातील नागरिकांना मोफत वाटली. यावर्षीदेखील ५०० मातीची भांडी व लावायला शक्य तेवढी मातीची घरटी लावण्याचा संकल्प घोषित केला आहे. असाच संकल्प सर्व पक्षिमित्र व नागरिकांनी करावा व आपल्या पुढील पिढीसाठी चिमणी व इतर पक्षी यांचे संवर्धन करावे.

चला तर मग दूर करूया Sorrows of Sparrows..



**हेमराज पाटील**
चोपडा,जिल्हा जळगाव
९९२२०८५४३४

# टपाल तिकिटांच्या दुनियेत

**Crimson Sunbird (Aethopyga siparaja) मिलिंद**

हा पक्षी चिमणीच्या आकाराचा आहे. भडक चमकदार जांभळा, हिरवा व किरमिजी रंगाच्या या सूर्यपक्ष्याची शेपूट लांब टोकदार चमकणाऱ्या हिरव्या रंगाची असते. पुठ्ठ्याकडील भाग पिवळ्या रंगाचा असतो. मादीची शेपूट थोटकी, जांभळ्या रंगाच्या अन्य शिंजिराप्रमाणे असते, मात्र वरील बाजू मळकट हिरव्या रंगाची व खालील बाजू मळखाऊ राखाडी हिरव्या रंगाची असते.

हा पक्षी भारतात दमट पानगळी व सदाहरित जंगल असलेल्या प्रदेशात हिमालयीन व द्विपकल्पीय भारतातील टेकड्यात आढळतो. आपल्या जलद हालचालीने सतत इकडून तिकडे फिरत असतो. टोकदार वाकडया चोचीने फुलांमधील मकरंद गोळा करीत असतो. त्यासाठी कधी कधी झाडांच्या फांदयांवर उलटा लटकलेला दिसतो. कीटक व कोळी हे त्याचे अन्न आहे.

**Red Billed Blue Magpie (Urocissa erythrorhyncha)**

हा निळा पक्षी कबुतराच्या आकाराचा असून त्याच्या शेपटीचे दोन पंख १५ ते १६ इंच लांब असतात. डोके, गळा व छाती काळया रंगाची असते व त्या खालील भाग फिकट पांढऱ्या रंगाचा असतो. शेपटीच्या पंखाचे टोक पांढऱ्या रंगाचे असतात. चोच व पायाचा रंग लाल असतो. नर व मादी दोघेही सारखेच दिसतात. हा पक्षी हिमालयामध्ये साधारण १०,००० फुटापर्यंत सर्वत्र आढळतो. पश्चिम हिमालयातील डोंगराळ प्रदेशात नेहमी संचार करतो. हा पक्षी संथपणे आवाज करीत उड्डाण घेतो. आपली लांब शेपूट पसरवत उडणारा त्यांचा समूह बघणे मन मोहवून टाकते.

**The Brown-fronted pied Wood-pecker**
**(Dryobates himalyansis) तपकिरी मुकुटाचा सुतार**

हा पहाडी पक्षी साधारण ८ इंच लांबीचा असतो व पश्चिम हिमालयातील जंगलामध्ये २००० ते ७००० फूट उंचीपर्यंत आढळून येतो. याच्या पाठीवर काळया व पांढऱ्या रंगाच्या आडव्या तिरप्या रेषा असतात व शेपटीच्या खाली एक लाल रंगाचा ठिपका असतो. नराच्या डोक्याच्या तुऱ्याचा पुढील भाग सोनेरी भुरकट रंगाचा असतो व मागील भाग तपकिरी रंगाचा असतो. मादीच्या डोक्यावर हे रंग नसतात.

भारतीय टपाल खात्यातर्फे दि. ३१ डिसेंबर १९६८ रोजी भारतात आढळणाऱ्या विविध पक्ष्यांवर चार तिकिटांचा संच प्रकशित केला. त्यामध्ये वरील तीन टपाल तिकिटाचा समावेश आहे.










रवींद्र वामनाचार्य
९८९०३९०५२७

## स्वागत नवीन सभासदांचे
## (दि. १ जानेवारी २०२० ते ३१ मार्च २०२०)

| क्रमांक | नाव | गाव | संपर्क |
|---|---|---|---|
| ११५२ | डॉ. व्यंकटेश एस. मेतन | सोलापूर | ९३७००८००९० |
| ११५३ | प्रा. डॉ. जी. डी. देशमुख | नागभीड | ९४०३१५१७५२ |
| ११५४ | प्रा. डॉ. योगेश डी. आखरे | अमरावती | ९९२२५१५१७१ |
| ११५५ | डॉ अनिश कानिटकर | सांगली | ९७३०३०२५५० |
| ११५६ | श्री. अमोल सावंत | अकोला | ९८२२७२८८२३ |
| ११५७ | प्रा. रेश्मा कृष्णा माने | सोलापूर | ८९२८७७४०२८ |
| ११५८ | श्री. शबादे रेवणसिद्ध कलप्पा | सोलापूर | ९८६००४१८४९ |
| ११५९ | मधुरा मिलिंद किल्लेदार | सांगली | ९४२२०४००५८ |
| ११६० | श्री. अनिल नामदेव बहादुरे | नागपूर | ९८९०२१६१५० |
| ११६१ | डॉ. मिलिंद किल्लेदार | सांगली | ९४२२६१४७८४ |
| ११६२ | श्री. राजपालसिंग आ. राजपूत | – | ९२७१५०५१७५ |
| ११६३ | श्री. संतोष एल. किणी | पनवेल | ९८३३५१६७९४ |
| ११६४ | श्री. संजय ए. कारंडे | मालाड | ९९८७५२५४७४ |
| ११६५ | श्री. अतुल कृ. आपटे | विलेपार्ले | ९८२०८७०५६८ |
| ११६६ | श्री. देवेंद्र ठाकूर | न्यू पनवेल | ९३७१०३९६५९ |
| ११६७ | श्री. अमित आर. परळकर | मुंबई | ९६९९९१४०९५ |
| ११६८ | श्री. बाबासाहेब जावळे | भुसावळ | ९२७२५७७४३३ |
| ११६९ | कु. ऐश्वर्या तानाजी भोसले | सातारा | ७८७५५५९९७५ |
| ११७० | कु. तन्वी भाऊसाहेब नाईक | सांगली | ९४२२६४१०५९ |
| ११७१ | विजया जोशी | सातारा | ९९७०६९७३८९ |
| ११७२ | यश तू. मस्करे | जुन्नर | ९९८७३३२९०० |
| ११७३ | ॲड. मानसी घनश्याम वैद्य | सातारा | ९९६०२८२११० |
| ११७४ | ॲड. सीमंतिनी श्री. नूलकर | सातारा | ९८२२३२३८४७ |
| ११७५ | श्यामलता प्र. काकडे | सातारा | ९०११०७८२८५ |
| ११७६ | हर्षल विजय राजेशिर्के | सातारा | ९८५०९५४८४२ |
| ११७७ | जितेंद्र महादेव ठाकरे | ठाणे | ९९८७१३१९२२ |
| ११७८ | श्री. नागनाथ रा. थिटे | नवी मुंबई | ९८९२९८४४८५ |
| ११७९ | अनिता शरदचंद्र पाटील | नागपूर | ९८२३८३२१३६ |

## तापी नदीच्या खोऱ्यात

## 'गवती वटवट्या'चे दुर्मीळ दर्शन

भारतातील उत्तर आणि ईशान्यकडील राज्यांमध्ये प्रामुख्याने आढळणाऱ्या 'गवती वटवट्या' (डीीळरींशव) पक्ष्याचे दुर्मीळ दर्शन महाराष्ट्रात घडले आहे. गेल्या आठवड्यात भुसावळच्या पक्षीनिरीक्षकांनी तापी नदीच्या खोऱ्यातून या पक्ष्याची नोंद केली आहे. पक्षीतज्ज्ञांच्या मते, 'गवती बटबट्या पक्ष्याची ही महाराष्ट्रातील पहिलीय छायाचित्रित नोंद असल्याने या पक्ष्याच्या अधिवासाबाबत शास्त्रीय निरीक्षण नोंदविण्याची आवश्यकता आहे.

या पक्ष्याच्या अधिवास प्रामुख्याने गवताळ प्रदेशात असतो. विणीच्या हंगामात हे पक्षी केवळ गवताबाहेर येऊन एकमेकांना आवाज देतात. गेल्या अडीच वर्षापासून ऑक्टोबर ते मार्च महिन्यांदरम्यान तापी नदीच्या खोऱ्यालगतच्या साधारण तीन किलोमीटरच्या पट्ट्यातील गवताळ प्रदेशात गवती वटवट्याचे दर्शन घडत असल्याची माहिती लक्ष्मीकांत नेदे यांनी दिली.

१५ वर्षांपूर्वी राज्यातील काही भागात हा पक्षी आढळून आल्याच्या चार ते पाच नोंदी आहेत. मात्र, त्याला छायाचित्रांचा ठोस पुरावा नाही. त्यामुळे नेवेना मिळालेले गवती वटवट्याचे छायाचित्र हा महाराष्ट्रातील या पक्ष्याचा पहिलाच छायाचित्र पुरावा असल्याची माहिती प्रसिद्ध पक्षिनिरीक्षक आणि अभ्यासक न आदेश शिवकर यांनी दिली.

## आपण लिहिता

आपण महाराष्ट्र पक्षीमित्र च्या या (१ जानेवारी २०१९ अंक २ रा) अंकात मी पाठविलेला आमचा टिटू हा लेख समाविष्ट केला. त्याबद्दल आपला आभारी आहे. आपण व्यक्त केलेला संपादकीय मधील आपला विचार अगदी योग्य वाटला. महाराष्ट पक्षीमित्राने पक्ष्यांच्या संगोपनासाठी आणि जखमी पक्ष्यांची काळजी कशी घ्यावी याबाबत माहितीपुस्तिका तयार केल्यास माझ्यासारख्या अनेक पक्षीप्रेमी ना खूप फायद्याचे होईल.

आपला आभारी,

**सुधर्म पोटे**

९५९५३६५४८६



## लेबॅनॉनमधील पक्षी संहार

इस्त्राइलच्या उत्तरेला लेबॅनॉन हा देश आहे. तो पक्ष्यांच्या स्थलांतर मार्गावर आहे. देशात दोन पर्वतरांगा आहेत. त्यांच्या मधून स्थलांतरित पक्षी मार्गक्रमण करत असतात. पण ती मृत्युखाई आहे. हे त्यांना कळत नाही. वर्षभरात दोन्ही दिशांच्या स्थलांतरात सुमारे २.५ अब्ज (एकवर नऊ शून्ये) पक्षी प्रवास करतात. त्यातील जवळ जवळ २६ लाख पक्षी एकतर मारले जातात किंवा पकडले जातात.

लेबॅनॉनमध्ये जिकडे तिकडे बंदुका दिसतात. अगदी दहाबारा वर्षांची मुले खांद्यावर बंदूक लटकावून फिरतात. शिकार हा जणू इथला खेळ आहे. काही पक्षी खाल्ले जातात तर काही तसेच पडून राहतात.

या पक्षिसंहाराला आळा घालण्यासाठी जागतिक पातळीवर प्रयत्न सुरू आहेत.



## पवनचक्कीमुळे पक्ष्यांचे मृत्यू

कच्छ आणि कर्नाटकातील पवनचक्क्यांमुळे पक्ष्यांचे किती मृत्यू होतात याबाबत संशोधकांनी ३ वर्षांची आकडेवारी जमविली असता, ५२ ठिकाणी ११ प्रजातींच्या ४७ पक्ष्यांचे मृत्यू झाल्याचे समोर आले.

('फ्लेमिंगो'वरून)



## श्रद्धांजली

नाशिक येथील आपले एक सभासद श्री. रमेश महाले याचे १५ फेब्रुवारी रोजी निधन झाले. ते निवृत्त माध्यमिक शाळा मुख्याध्यापक होते. त्यांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार राष्ट्रपतींच्या हस्ते मिळाला होता. बालभारतीच्या सातवीच्या पुस्तकात त्यांच्या डॉल्फिन या लेखाचा समावेळ आहे. गुजरात सरकारच्या क्रमिक पुस्तकातही जिराफ व डॉल्फिन या धड्यांचा समावेश आहे. पक्ष्यांची दुनिया या त्यांच्या पुस्तकास मराठी विज्ञान परिषदेचा पुरस्कार मिळाला होता.

**पक्षीमित्रतर्फे श्रद्धांजली**

# महाराष्ट्र पक्षीमित्रचे आजच सभासद व्हा !

आजीवन सभासद शुल्क रू. १०००/-

(५०० सभासद शुल्क + ५००/- अंक निधी)

आपण सभासद असाल तर अजून एक तरी सभासद नोंदवा.

## सभासद कसे व्हाल ?

१) डी.डी/मनीऑर्डर, ''महाराष्ट्र पक्षीमि''' या नावे अमरावती येथे देय असलेला असावा.

२) Core Bank System नेही पैसे पाठवू शकता.

बँकेचे नाव : बँक ऑफ महाराष्ट्र, गाडगे नगर, अमरावती

खात्याचे नाव : महाराष्ट्र पक्षीमित्र

बँक खाते क्र. : 60036812017

IFSC Code : MAHB0000639

खात्यात पैसे भरून त्वरीत मेलने कळविणे, तसेच सभासदत्वाचा अर्ज भरून पोस्टाने पाठवणे अनिवार्य आहे. सोबत पे-इन स्लीपची झेरॉक्स जोडावी.

३) पत्रव्यवहाराचा पत्ता :- महाराष्ट्र पक्षीमित्र, द्वारा डॉ. गजानन वाघ,

अरण्यार्पण, ६३ समता कॉलनी, कठोरा रोड, अमरावती ४४४६०४

Email : pakshimitra@gmail.com

Phone No. : 0721 - 2552334

Website : www.pakshimitra.org

## त्रैमासिक अंक निधी :

महाराष्ट्र पक्षीमित्र संस्थेचे मुखपत्र त्रैमासिक अंक पक्षीमित्र हा आपण दर तीन महिन्यांनी प्रकाशित करत असतो. या अंकाला छपाई व पोस्टेज मिळून वार्षिक ५५,०००/- ते ६०,००० रूपये खर्च येतो. संस्थेचे नियमित उत्पन्न काहीच नाही त्यामुळे हा अंक परवडत नाही, पक्षीमित्र संस्थेच्या व पक्षी संवर्धन संरक्षण कार्यात या अंकाची अत्यंत आवश्यकता आहे. याचसाठी हा अंक असाच चालू ठेवा असे वार्षिक सर्वसाधारण सभेत ठरवण्यात आले आहे. याच्या खर्चासाठी त्रैमासिक अंक निधी उभा करण्याचे ठरविण्यात आले आहे. आपण सुद्धा या अंकासाठी देणगी देऊन हातभार लावावा ही नम्र विनंती.

संस्थेच्या प्रकल्पाला आपण सुद्धा देणगी देऊन हातभार लावावा ही विनंती.

# महाराष्ट्र पक्षीमित्र

(संस्था रजि. नं. महा/२८५/९८/नागपूर)

## ✻ सभासद अर्ज ✻

प्रति,

मा. अध्यक्ष,

महाराष्ट्र पक्षीमित्र.

महोदय,

मला महाराष्ट्र पक्षीमित्र, नागपूर नोंदणी क्रमांक महाराष्ट्र/२८५/९८/नागपूर या संस्थेचे नियम व उद्दिष्ट्ये मान्य आहेत. मी शपथपूर्वक सांगतो की, मी सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करीन. मी वरील संस्थेचा आजीवन सभासद होऊ इच्छितो. माझा व्यक्तिगत तपशील खालील प्रमाणे आहे.

संपूर्ण नाव : ______________________________

संपूर्ण पत्ता : ______________________________

______________________________

फोन नं. : ______________ मो. नं. : ______________

ई–मेल : ______________________________

जन्मतारीख : ______________________________

शिक्षण : ______________________________

नोकरी/व्यवसाय : ______________________________

छंद : ______________________________

माझी वर्गणी सोबत देत आहे (D.D. / Money Order / Core Bank System )

कृपया माझी सभासद म्हणून स्वीकृती व्हावी ही नम्र विनंती.

| | | |
|---|---|---|
| दिनांक | अध्यक्ष | आपला |
| अर्ज मंजूर/नामंजूर | महाराष्ट्र पक्षीमित्र | सही |

Visit below link for become a Member

https://www.pakshimitra.org/contact-us/become-a-member

**Book Post**

प्रति,

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

प्रेषक :


## महाराष्ट्र पक्षीमित्र

(संस्था रजि. नं. महा/२८५/९८/नागपूर)

**६३, अरण्यार्पन समता कॉलनी, कठोरा रोड, ता. जि. अमरावती. पिन – ४४४ ६०४**

Email : pakshimitra@gmail.com | Website: www.pakshimitra.org



## पक्षीमित्र

**संपादक : दिगंबर गाडगीळ**

मूल्य : रू. ५/-

**मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.**


## प्रपत्र IV

१) **प्रकाशन स्थळ :** महाराष्ट्र पक्षीमित्र, ६३, अरण्यार्पण, समता कॉलनी, कठोर रोड, अमरावती : ४४४६०४.

२) **प्रकाशन कालावधी :** त्रैमासिक.

३) **मुद्रक :** श्री. चंद्रकांत डी. सुरडकर (गुरुदेव प्रिंटर्स), पत्ता : वि.एम.वी. रोड, अमरावती.

४) **प्रकाशक :** डॉ. जयंत वडतकर, (अध्यक्ष, महाराष्ट्र पक्षीमित्र. राष्ट्रीयत्व : भारतीय.
पत्ता : ४२, ग्रीनपार्क कॉलनी, आशियानाजवळ, शेगावरोड, अमरावती : ४४४६०४.

५) **संपादक :** श्री. दिगंबर गाडगीळ. राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : ३९, आनंदवन कॉलनी, ऑफ कॉलेजरोड, नाशिक. (महाराष्ट्र) ४२२००५.
मी, जयंत सुधाकरराव वडतकर जाहीर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या माहितीनुसार बरोबर व खरी आहे.

दिनांक १ एप्रिल २०२०

सही/
जयंत सुधाकरराव वडतकर.